गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काटेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर.
फोन न : 0241-2993900
*नियम व अटी लागू

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
Since 1935
मे. हरी बाकाजी देउगांवकर
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. १४४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शनिवार दि. ०३.०८.२०२४ | अंक नं. १३२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

'दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळ्या'तील दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करा

अन्यथा आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार; पडताळणीसाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र पथक नेमा

नगर – राज्यात मोठ्या प्रमाणात दिव्यांग प्रमाणपत्राचे घोटाळे गाजत असताना या प्रकरणातील दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करुन दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणीसाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र पथक नेमण्याची मागणी प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. बनावट दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन मूळ दिव्यांग व्यक्तींवर अन्याय होत असताना, शासन याची गांभीर्याने दखल घेत नसल्याचे स्पष्ट करुन संघटनेचे जिल्हाध्यक्ष अँड. लक्ष्मण पोकळे यांनी दिव्यांग बांधवांसह पुणे येथील दिव्यांग कल्याण आयुक्तालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

राज्यात व देशात दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळा गाजत आहे. मात्र याकडे महाराष्ट्र शासन व केंद्र शासन गांभीर्याने दखल घेताना दिसत नसून, ही चिंताजनक बाब आहे. बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे अनेकांनी केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग व राज्य शासनाच्या विविध विभागात नोकरी, सवलती मिळवून मूळ दिव्यांग व्यक्तींवर खूप मोठा अन्याय केलेला आहे. ही शासन आणि समाजाची एकप्रकारे फसवणूक केली आहे. त्यांच्यावर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार प्राधान्याने कारवाई करणे अपेक्षित असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

दिव्यांग प्रमाणपत्र हे सध्या शासकीय रुग्णालय, महापालिकांचे रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयांच्या रुग्णालयातून वितरित केली जात आहेत. मात्र व्यक्ती तपासणीसाठी आलेली नसताना ही शासनाच्या स्वावलंबन कार्ड या संकेतस्थळावर युडीआयडी क्रमांक मिळवत काही व्यक्तींनी दिव्यांग प्रमाणपत्र मिळवल्याचे प्रकरण नुकतेच अहमदनगर जिल्हा रुग्णालयात उघडकीस आले आहे. २६ जुलै रोजी येथील अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक साहेबराव डावरे यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिलेले आहे, मात्र तरी अहमदनगर जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी याबाबत गुन्हा दाखल केलेला नसल्याचे म्हंटले आहे.

जिल्हा रुग्णालयामध्ये तपासणी न होता, शासनाच्या संकेतस्थळावर ही दिव्यांग प्रमाणपत्रे कशी आली? हा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे. ही गंभीर बाब असून, याबाबत गुन्हा दाखल होऊन अहमदनगर जिल्हा सायबर पथकामार्फत चौकशी व्हावी. याप्रमाणे इतर जिल्ह्यातही असले प्रकार घडलेले असण्याची शक्यता आहे. युडीआयडी क्रमांकाच्या आधारे ज्या दिव्यांगांना प्रमाणपत्र मिळाले, त्या दिव्यांगाची नोंद शासकीय रुग्णालयामध्ये आहे का?, त्यांच्या वैद्यकीय तपासण्याचे अभिलेख रुग्णालयामध्ये आहेत का? त्याची तातडीने तपासणी केली जावी. गत २५ वर्षांच्या कालावधीत अभिलेख तपासण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

अनेक धडधाकट व्यक्ती दिव्यांग नसताना देखील त्यांना ४०% दिव्यांग दाखवून दिव्यांग प्रमाणपत्र दिलेली आहेत. अनेक प्रकरणातून ही बाब उघड झाली आहे. रुग्णालयांमध्ये नीट तपासणी न होता, पैसे घेऊन खोटी प्रमाणपत्र दिली जात आहे. यामध्ये डोळ्यात दिव्यांग असलेले व कर्णबधिर असलेले लोक मोठ्या संख्येने आहेत. ज्या दिव्यांग व्यक्तीना रुग्णालयातील तपासणीनंतर प्रमाणपत्र मिळालेली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत पडताळणी होणे आवश्यक आहे. यामध्ये खऱ्या दिव्यांग व्यक्तींना त्रास व्हायला नको म्हणून पथक नेमून तालुकास्तरावर पाठवून अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी पाठवून तपासणी व्हावी, दिव्यांग नसताना अथवा अपूर्ण कागदपत्रे असताना ज्या व्यक्तींना दिव्यांग दाखविले गेले त्यांची प्रमाणपत्र रद्द करून प्रमाणपत्र देणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हे दाखल करावेत, जिल्हा रुग्णालयातील महत्त्वाची कामे कंत्राटी कामगार करीत असून हे काम सरकारी कर्मचाऱ्यांना देण्यात यावे, दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन ज्या व्यक्तींनी नोकरी, बदली व इतर शासकीय सवलती घेतल्या त्या सवलती तात्काळ रद्द करून त्यांच्यावर गुन्हे दाखल व्हावेत, त्यांना शासनाकडून मिळालेला पगार व इतर लाभ वसूल करावा, पडताळणी शासकीय रुग्णालयातील अधिकाऱ्यांमार्फत करू नये, निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र पथक नेमून ही पडताळणी व्हावी, या पडताळणी पथकामध्ये समाज कल्याण, सामान्य प्रशासन, इतर विभागाचे अधिकारी, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी व खाजगी तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश करावा, सरकारी रुग्णालयातील डॉक्टर या घोटाळ्यात सहभागी असल्याने त्यांच्याकडे पडताळणीचा अधिकार देऊ नये, या मागण्या संघटनेच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

सुवर्णखरेदी फायद्याची मोठी संधी बचतीची
22 कॅरेट सोन्याचा भावही कमी आणि मजुरीही कमी !
कुंदन, टेम्पल, कलकत्ती, फॅन्सी दुशी व स्टोन सेटींगमधील दागिन्यांची
प्रतीग्रॅम मजुरी ₹555/-* पासून
आजच चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील या आमच्या खास काऊंटरला भेट द्या.
खास रक्षाबंधनानिमित्त सोन्या-चांदीच्या राख्या आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
ऑफर मर्यादित कालावधीसाठी, नियमित ग्राहकांचा आभारी आहे.
*नियम व अटी लागू.

पावसाळ्यात पसरणाऱ्या साथीच्या आजारांवर खात्रीशीर होमिओपॅथिक उपचार
सलाईन नाही, इंजेक्शन नाही, ॲडमिट होण्याची भीती नाही,
होमिओपॅथी उपचाराने व्हा घरच्या घरीच बरे
डेंग्यू, न्यूमोनिया, मलेरिया, कावील, टायफॉईड
डॉ. प्रतीमा बोरा यांचे डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड, कावील, चिकनगुनिया, कॉलरा, न्यूमोनिया, व्हायरल इत्यादी आजारांवर प्रभावी होमिओपॅथी उपचार
7 दिवसांच्या होमिओपॅथी उपचारासाठी फक्त ₹200/-*
अधिक माहिती व नियोजीत भेटीसाठी - नक्षत्र मेडिकल मागे, चाणक्य चौक, बुरुडगाव रोड, अहमदनगर.
संपर्क : 8378 850 850
DR. BORA HOMEOPATHY CLINIC
*अटी व नियम लागू

झेरॉक्स मशिन शोरुमकरिता पाहिजेत
* मार्केटींग-ग्रज्युएट टू व्हिलर लायसन्स, किमोयाची सवारी व कॉम्प्युटर नॉलेज
* ऑफिस असिस्टंट १२ वी कॉमर्स, कॉम्प्युटरचे नॉलेज
* ऑफिस बॉय साफसफाई, मराठी वाचता येणे
सर्व पुरुष (वयोमर्यादा २५)
आर.बी.इलेक्ट्रॉनिक्स, स्वस्तिक चौक, स्टेशनरोड, 9822595890

अप्रतिम सुगंध पुनेत आणील मनप्रसन्नता, एकाग्रता व शांती
प्रिमियम प्रोडक्ट अगरबत्ती
निळकंठ
शुभलाभ, भालवासी, गोमेन्दल, इंडियन क्लस्तुरी, केशर चंदन, ब्रश (शाळा), ब्लु बर्ड, यात्रा व कापूर, लोबान (उद), सेंट्रा, अत्तर, धूप, हॉलसेल व रिटेल साठी अगरबत्ती जिल्हा वितरक
केवळ अगरबत्ती
आडते बाजार, सराफ मिराळ सोमोर, अ.नगर.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. निनंबर मारुती साळुंके यांचे पुर्वज नागे कै. भगाभी साळुंके उर्फ घिसाडी, कै. भैरू (बहिरू) भगाभी साळुंके उर्फ घिसाडी व कै. मारुती भैरू साळुंके उर्फ घिसाडी यांच्या मालकीच्या मिळकती अहमदनगर येथील कॅन्टोन्मेंट क्षेत्र, नगर औरंगाबाद रोड, कोठला, सावेडी, मंगलगेट, कोंडीमामा चौक, माळीवाडा, केडगाव, नालेगाव, राहुरी घोडगाव रोड व इतर ठिकाणी, तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर या गावामध्ये असून सदरील मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदरील मिळकती खालील कोर्टांमध्ये दर्शविलेले इसम नामे १) श्री. वसंत सहादू साळुंके, २) श्री. सुरेश सहादू साळुंके, ३) श्री. चंद्रशेखर किसन साळुंके व ४) श्री. नितीन किसन साळुंके परस्पर खोटध्यानादाचा कागदपत्रांच्या आधारे एकटे मालक असल्याचे भासवून हडप व गिळंकृत करून तिन्हाईत इसमांची दिशाभूल करून आमचे अशिलांचे परस्पर हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याकामी आमचे अशिलांनी सदर इसमांविरूद्ध पोलीसांत फिर्याद अर्ज दिला असून सदर प्रकरणी सदर फोटोंमध्ये दर्शविलेले इसम पोलीस स्टेशनमध्ये हजर होऊन त्यांनी सदर मिळकतीबाबत कुठलाही व्यवहार केला नसल्याचा पोलीसांना जबाब दिला आहे. या उपर सदर मिळकतींबाबत खालील इसमांशी कोणीही कुठलाही व्यवहार केला असल्यास सदरचा व्यवहार हा मूळतः बेकायदेशीर राहित. त्यामुळे खालील इसमांशी कोणीही करार, मदार, दान, पान, लिज, लिन, ट्रान्सफर, खरेदीविक्री, विकसनकरारनामा इत्यादी करू नये. जर कोणी वरील इसमांशी आमचे अशिलांचे संमती शिवाय कुठलाही व्यवहार व करारमदार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचा व्यवहार बेकायदेशीर व रद्द समजण्यात येईल.

सबब सदरीलजाहीर नोटीस दिली असे.

अहमदनगर
दि. ०३/०८/२०२४

ॲड. मयुर निनंबर साळुंके
फ्लॅट नं. ८, सत्यराज क्लासिक बिल्डींग, सिटीएस २८९, शुक्रवारपेठ, पुणे ४११००२.
मोबाईल ९९५८८७४७३९

श्री. सुरेश सहादू साळुंके | श्री. नितीन किसन साळुंके | श्री. चंद्रशेखर किसन साळुंके | श्री. वसंत सहादू साळुंके

सेल... सेल... सेल... सेल... सेल... सेल...
सेलचा मिलवा सेल
सेलचा मिलवा सेल
सेजत महासेल महामेळावा
इस से सस्ता कही नहीं...
शालु | फॅन्सी डिझायनर साडी
कॉटन सिल्क साडी | कॅटलॉग साडी
प्युअर येवला पैठणी
महिलांसाठी रोजगार योजना
घर बसल्या साड्यांचा व्यवसाय करुन कमवा ५ ते ५० हजार महिना तेही मिल रेटमध्ये
मिल टु ग्राहक
SNB MILL
फॅन्सी साडी । कुर्ती । टॉप । लेगिंग्ज
8182818220
नगर अर्बन बँक रोड, बोरा ज्वेलर शेजारी, कापड बाजार, अहमदनगर – ४१४ ००१

Adarsh Consultancy
रेरा कन्सल्टंसी व रिडेव्हलपमेंन्टच्या मार्गदर्शनासाठी विश्वसुनीय नाव
आदर्श कंन्सल्टंसी
जून्या इमारती/सोसायटी अपार्टमेंन्टच्या पुर्नविकासासाठी सल्ला व मार्गदर्शन.
मूळ सभासदांना नवीन इमारतीत, त्यांच्या सदनिकेत, योग्य ते वाढीव क्षेत्र मिळण्यासाठी मार्गदर्शन.
पुर्नविकासासाठी संपूर्ण कायदेशीर व तांत्रीक बाबींचा सल्ला.
आर्किटेक्ट, इंजीनीयर, वकील इ. तज्ञ लोकांची टीम.
पुर्नविकास होईपर्यंत मूळ सभासदांसाठीच्या तात्पुरत्या जागेसाठी मार्गदर्शन.
योग्य ते Feasibility Report / Training Process व अजून बरेच काही.
- Project Registration with MAHARERA
- Old Project Correction
- 45 Days Project Monitoring After RERA Registration
- MAHARERA Notice & Queries Reply
- Estimate of Project with Engineer's Certificate
- Title Search Report as Per MAHARERA
- Quarterly Project Report Submission
- Bank A/cs Guidance as Per MAHARERA
प्रोजेक्टचा अहवाल वेळेत सादर केला नाही तर, महारेरा आपल्या प्रोजेक्टला दंड करु शकते.
संपर्क : इंजिनियर प्रकाश जैन B. E. (Civil), Chartered Engg., Rera Consultant, Govt approved valuer
ऑफिस : O-1, आदर्श समृद्धी, चौपाटी कारंजा, अ.नगर.
मो. 9422220762 / 8975112345

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
अमर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस- चितळेरोड, अ.नगर
9657746555/ 9226399555
नगर-पुणे-नगर
आता आपल्या हाताचुन
Ac Xcent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
बुकिंग आवश्यक
दरवीज
■ नगर वेळूनन स. ७,८,९ व दुपारी २.०० ■ पुणे वेळूनन स.११,१२,१ व सायं.५ वा
शिवाजी पॉइंट -चितळा पीठ, झोपडी कॅन्टीन, तारकपूर,हिरोंदा, एम सेंस पीठ,शास्त्रीपीठ,बेलाना
पुणे झोप- मार्केटी, वरवी बायपास,सेवडा, नवीन सिव्हीलगेन शास्त्रीपीठ.

देवदयाल | प्रवीण नगर | प्रवीण मेहुल
स.उ. प्रभाव बाबा अगरबत्ती बिल्डींग सप्लाय | सौ. उर्मिलाताई जगताप जिल्हा निबंधक | अ. उमेशभाई जगताप अध्यक्ष
बेतूल प्रत्येकास अभिमानाचे..
अभिष्टचिंतन आपल्या बेतूलास
शतायू..दिर्घायू..यशस्वी होण्याचे..
'सनीबाबा'
वाढदिवसाबिभित्त आभ्यया
हार्दिक शुभेच्छा..!
मा.श्री. संतोष लहानु सुर्यवंशी (सनीबाबा)
आजवे बंधू
त्रिमुर्ती पान स्टॉल
मार्केट यार्ड गेट जवळ, अहमदनगर.

आकर्षक गिफ्ट आर्टिकल्सवर २५% सूट
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल ॲण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझड गिफ्ट ॲण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य नुंद्येचा

email - navamaratha@gmail.com

हमारे श्रद्धा का सुखद धाम... आनंद धाम...

भारतीय संस्कृतीला धार्मिक अधिष्ठानाचे सुंदर कोंदण आहे. प्रत्येक धर्म, पंथ, जातीत आपापल्या परंपरा, श्रद्धास्थाने व क्षेत्रांना अनन्यसाधारण महत्त्व असते. ज्या ठिकाणी साधुसंतांच्या जीवनस्पर्शाची अनुभूती झाली ती स्थान तीर्थक्षेत्र बनली.

जैन समाजात सम्मेद शिखरची व पालीताना ही प्रमुख तीर्थक्षेत्र आहेत. आम्ही नगरवासिय अधिक भाग्यवान. आम्हाला आचार्यश्रीजींच्या वास्तव्याने तीर्थक्षेत्रासम जीवन मिळाले. गुरुदेवांबद्दल किती लिहावे. त्यांच्याच पुण्याई व आशीर्वादाने आनंदधाम परिसर आमचे पंढरपूर बनलेय.

आचार्यश्री आनंदऋषीजी म.सा. – गुरुदेव हे सर्वतोभद्र होते. म्हणजेच

वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन
"मुसाफिर"–९८२२०२०६९१

सगळ्यांचे, सर्व बाजूंनी कल्याण करणारे!

आनंद धाम येणाऱ्यांना आनंद, शांती, समाधानाची अलौकिक अनुभूती घेता येते, तुम्ही पण हा अनुभव जरूर घ्या. गुरुदेवांमुळे नगरच्या धार्मिक, शैक्षणिक, आध्यात्मिक क्षेत्रात विलक्षण योगदान व महत्त्व मिळालेय. त्यांचे गुणानुवाद करण्यास आपण कमीच असू–

सात समंदर स्याही करूं – लेखनी करूं क्या मुसाफिर ।
सारी धरती कागज करूं – गुरु गुण न लिखा जाय ।।

कार्यारंभ आदेश असलेल्या रस्त्याचे काम सुरू करा अन्यथा रास्ता रोको आंदोलन

विधानसभा निवडणुक डोळ्यासमोर ठेवून कामाला विलंब लावल्याच आरोप

नगर – फेब्रुवारी २३ रोजीचा कार्यारंभ आदेश हातात असूनही सर्जेपुरा ते लालटाकी रस्त्याचे डांबरीकरण रखडलेले आहे. आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोरे ठेऊन त्या काळात या रस्त्याचे काम पूर्ण झालेले दाखवता यावे यासाठी म्हणून की काय या रस्त्याचे काम रखडलेले आहे. या रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी काँग्रेस प्रदेश सचिव, माजी नगरसेवक दीप चव्हाण यांनी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

या संदर्भात प्राथमिक चर्चा दीप चव्हाण यांनी अधिकाऱ्यांशी केली त्यात त्यांना या विषयासंदर्भात भयानक वास्तव समोर आले. त्यामुळे आता त्यांनी रास्ता रोको करण्याचा इशारा दिला आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे. १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता लालटाकी चौकात हा रास्ता रोको होणार आहे. गेल्या १५ वर्षांपासून हा रस्ता खड्ड्यात नांगरून ठेवलाय शेतासारखा आहे. या रस्तावरुन प्रवास करतांना पादचारी आणि दुचाकी तसेच चार चाकी स्वारांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागतो. त्यामुळे जनसामान्यांचा जिवाळ्याचा हा प्रश्न झाला आहे. म्हणून या भागातील रहिवासी तसेच सामान्य नगरकर आणि सर्वपक्षीय नेतेमंडळी यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन चव्हाण यांनी केले आहे.

नगर शहरातील सर्वात महत्त्वाचा हा रस्ता आहे. कापडबाजार तेलीखुंट डाळमंडई तसेच चितळे रोड नवीपेठ येथे सावेडीकर, तारकपूर वासियांना जायचे असल्यास जवळचा हाच रस्ता आहे. विविध शाळा महाविद्यालये, पोलीस मुख्यालय, बँडेड सोन्याची दालने, कपडयांचे मॉल, आणि चारचाकी दुचाकी वाहनांचे नामांकित शोरूम याच रस्त्यावर आहेत. वार्ड क्रमांक ९ आणि १० मधील हरिजन वस्ती, गोकुळवाडी, भारस्कर कॉलनी, रामवाडी याच रस्त्यावर आहेत. त्यामुळे राज्य शासनाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेतून भरीव ६० लाखांचा निधी यासाठी घेण्यात आला. त्यासाठी ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. ३० मार्च २०२३ रोजी या कामाला प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर १९ डिसेंबर २०२३ च्या रोजी निविदा काढण्यात आली. या निविदेला तांत्रिक मान्यता २०२३ मार्च २०२३ ला मिळाली आणि प्रत्यक्ष ठेकेदार मजूर संस्था मेसर्स एस. एफ. शेख कन्स्ट्रक्शन यांना कार्यारंभ आदेश देण्यासाठी १८ फेब्रुवारी २०२४ ही तारीख उजाडली. त्यानंतर पुढील चार महिन्यात ठेकेदाराने काम पूर्ण करावे अशी मुख्य अट असतांना देखील अद्याप काम सुरु झालेले नाही. जुलै संपून ऑगस्ट उजाडला तरी काम ठप्प आहे. नागरिक भर पावसात रस्त्यावरून जाताना खस्ता खात आहेत.

हा दलित वस्तीवर अन्याय आहे. एखादा लग्न समारंभ किंवा छोटा मोठा कार्यक्रम आहे म्हणून उद्यान सोसायटयामध्ये मागणी नसतांना निविदा न काढताच सिमेंट कॉंक्रीटचे पक्के रस्ते करून दिले जातात. आणि त्याला नंतर कार्योत्तर मंजुरी घेऊन बिल काढले जाते. ही वस्तुस्थिती आहे.

राज्य शासनाने नगरला मध्यंतरी जी १५० कोटी रुपयांची खिरापत वाटली त्यात या रस्त्याच्या पुढे असेलला सर्जेपुरा, तेलीखुंट, भिंगारवाला चौक ते पुढे माणिक चौक ते पंचपीर चावडी पुढे रामदासी मंदिर माळीवाडा वेस पर्यंतचा रस्ता मंजूर आहे. ठेकेदाराला काम देण्यात आले आहे. तरी देखील कार्यारंभ आदेश दाबून ठेवला आहे. या रस्त्याचे काम पूर्ण होण्यासाठी ४५ ते ६० दिवसांचा अवधी लागतो. आता जर काम सुरु केले तर गणपती पूर्वी काम संपेल आणि नगरकरांचा बास मोकळा होईल. पण ऐन निवडणुकांच्या तोंडावर तुम्ही काम सुरू करण्याचा विचार कशासाठी करीत आहेत. निवडणुकांच्या धामधुमीत नगर शहरातील सर्व रस्ते चकाचक केले हे दाखवूर केवळ रस्ता आम्ही तयार केला हे श्रेय घेण्यासाठी लोकप्रतिनिधींना मदत तर करीत नाहीत ना असा प्रश्न नगर कराना पडला आहे. या रस्त्याचे काम तात्काळ सुरु करा अन्यथा नगरकरांच्या रोषाला तुम्हाला सामोरे जावे लागेल, असा इशारा चव्हाण यांनी दिला आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने नगरमधील इच्छुक उमेदवारांकडून मागविले अर्ज

नगर – विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने तयारीला सुरुवात केली आहे. सप्टेंबर ऑक्टोबर २०२४ मध्ये या निवडणुका होतील असे अपेक्षित आहे त्यानुसार प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने राज्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. काँग्रेस जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी नगर जिल्हातील सर्वच्या सर्व १२ जागावरील इच्छुकांनी अर्ज भरण्यासाठी आवाहन केले आहे. त्यासाठी त्यांनी एक पत्र प्रसिद्धीला दिले आहे.

त्यांनी म्हटले आहे की राज्यातील विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका सप्टेंबर ऑक्टोबर २०२४ मध्ये होत आहे प्रांताध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या निर्देशानुसार निवडणुकीसाठी पक्षाच्या इच्छुक उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज मागवण्याची प्रक्रिया प्रदेश पातळीवर सुरु करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज जिल्हा काँग्रेस कमिटीमध्ये जमा करावेत हे उमेदवारी अर्ज पक्ष निधीच्या डी डी स्वरूपात जमा करून त्या पावतीसह ते प्रदेश कार्यालयात पाठवण्यात येतील, असे त्यांनी म्हटले आहे.

पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशासन आणि संघटन विभागाचे नाना गावंडे यांच्या सहीनीशी जिल्हाध्यक्षांना हे पत्र देण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी जिल्हा अध्यक्षांच्या मार्फत १० ऑगस्ट पूर्वी आपले अर्ज करावे. त्यासोबत सर्वसाधारण वर्गासाठी २० हजार रुपये आणि अनुसूचित जाती जमाती महिला उमेदवारांसाठी प्रत्येकी दहा हजार रुपये पक्ष निधी डीडी स्वरूपात जमा करावा असे नमूद करण्यात आले आहे.

बेशिस्त वाहतूक आणि अतिक्रमणांमुळे शहरातील रस्त्यांची होतेयं 'कोंडी'

वाहन चालविणे जिकीरीचे झाल्याने नागरिक त्रस्त

नगर – गेल्या अनेक वर्षांपासून नगर शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे आणि बेशिस्तपणे वाहतूक, चुकीची वाहन पार्किंग यामुळे रस्त्यांवर कायम वाहतूक कोंडी पाहायला मिळते. याबाबत प्रशासन, शहर वाहतूक शाखा, महानगरपालिका, अतिक्रमण विभागाला पाहूनही डोळे बंद करण्याची सवय लागली आहे. याबाबत वरिष्ठ अधिकारी दखल घेत नाहीत. त्यामुळे नगरकर महिला, विद्यार्थी, लहान मुलांना अनेक वेळा याचा त्रास सहन करावा लागतो. गेल्या अनेक वर्षांपासून नगर शहरामध्ये शहर वाहतूक शाखेचे कर्मचारी कोणत्याही भागात उभे असलेले दिसत नाही. वर्दळीच्या ठिकाणीही वाहतूक पोलीस दिसत नाही. दिल्लीगेट चौक हा मोठा रहदारीचा रस्ता आहे. त्या ठिकाणीही वाहतूक पोलीस कधी दिसत नाही. शहरातील दिल्ली गेट, चितळे रोड, कापड बाजार, डाळ मंडई, गंज बाजार, सर्जेपुरा, माळीवाडा, नवी पेठ, झेंडीगेट, कोठला या रस्त्यांवर किंवा या चौकांमध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे आहेत. याबाबत महानगरपालिका आयुक्त, अतिक्रमण विभाग, लोकप्रतिनिधी हे कोणतीच दखल घेत नाही. या अतिक्रमणांबाबत कारवाई करत नाही. त्यामुळे अतिक्रमण धारकांनं अतिक्रमण करण्यासाठी मोठा वाव मिळतो. इतर नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो बाजारपेठेमध्ये रस्ता छोटा असल्याने नागरिकांचे अतिक्रमणांमुळे वाहन चालवणे तर सोडाच पायी चालणेही मुश्किल होते.

महानगरपालिकेने अतिक्रमण विभागामार्फत आत्तापर्यंत अतिक्रमण धारकांवर अनेकदा कारवाया केल्या मात्र त्या भागातील अतिक्रमणे जैसे थे आहेत. अतिक्रमणाच्या विषयावर अनेक व्यापाऱ्यांवर हल्लेही झाले, नगर शहरात त्यामुळे तणावही निर्माण झाला, पण हे सर्व तेवढ्यापुरतेच. जिल्हाधिकारी, आमदार, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हाचे पालक हे जातीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना करून हे प्रश्न सोडवणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

रस्त्यावर अतिक्रमणे आणि बेशिस्त वाहन पार्किंगमुळे झालेली वाहतूक कोंडी. (छाया धनेश कटारिया)

पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील त्रुटींचा प्रश्न मार्गी लावणार

राज्याध्यक्ष उत्तरेश्वर मोहळकर यांचे प्रतिपादन; आदर्श बहुजन शिक्षक संघाने उच्च न्यायालयात केलेल्या पाठपुराव्यामुळे बैठकीचे आयोजन

नगर – ज्या शिक्षकांनी १ जानेवारी २०१६ पूर्वी पदवीधर वेतनश्रेणी स्वीकारलेली आहे त्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना त्याच दिवशी सेवेत असलेल्या उपशिक्षकापेक्षा सहाव्या वेतन आयोगानुसार मिळणारे मूळ वेतन जास्त मिळत होते परंतु सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारे मूळ वेतन रुपये १०० ने कमी आहे. त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक अन्याय झालेला आहे. यासंदर्भात गेल्या चार वर्षापासून अनेकवेळा शिक्षण संचालक, आयुक्त (शिक्षण), प्रधान सचिव (शालेय शिक्षण), प्रधान सचिव (ग्राम विकास), प्रधान सचिव (वित्त विभाग), शिक्षण मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री या सर्वांना निवेदन देऊन वेतनातील त्रुटी दूर करण्यासाठी पदवीधर शिक्षक यांना Pay Matrix S-१४ ऐवजी Pay Matrix S-१५ हा वेतन स्तर लागू करावा किंवा Pay Matrix S-१४ याच वेतन श्रेणीत एक वेतनवाढ जास्त देऊन वेतनातील तफावत दूर करावी, अशी मागणी केली होती. गेली चार वर्ष आदर्श बहुजन शिक्षक संघ (IBTA) या संघटनेने सर्व संबंधितांना प्रत्यक्ष भेटून प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांच्या सातव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करणे संदर्भात विनंती केलेली होती परंतु न्याय मिळाला नाही म्हणून संघटनेने १० एप्रिल २०२४ रोजी उच्च न्यायालय मुंबईच्या संभाजीनगर (औरंगाबाद) येथे ५८६ शिक्षकांची माहिती देऊन न्याय मिळण्यासाठी WRIT PETITION NO.4407 OF २०२४ याचिका दाखल केली होती. या केसचा निकाल ११/६/२०२४ रोजी लागला असून शिक्षण आयुक्त यांनी १२ आठवड्यात वेतन त्रुटी समितीकडे सादर करावा असे निर्देश दिलेले आहेत.

या अनुषंगाने शिक्षण विभाग व ग्राम विकास विभागाने पदवीधर वेतन त्रुटी संदर्भात परिपूर्ण असा प्रस्ताव वेतन त्रुटी समितीकडे सादर केला आहे. तसेच राज्य वेतन त्रुटी निवारण समिती २०२४ कडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता बैठकीस उपस्थित राहण्याशाठी अध्यक्ष आदर्श बहुजन शिक्षक संघ (IBT) यांना त्यांचे म्हणणे समितीसमोर मांडण्यासाठी मंत्रालय मुंबई येथे निमंत्रित केले आहे.

या अनुषंगाने बैठकीस उपस्थित राहण्यासाठी राज्यातील उत्तरेश्वर मोहळकर, राज्य उपाध्यक्ष आबा लोंढे, संतोष शिंदे, सुहास पवार, एकनाथ व्यवहारे, भगवान लोंढे, गौतम मिसळ आदर्श बहुजन शिक्षक संघ जणांना आहेत. पदवीधर वेतनश्रेणी त्रुटी संदर्भात अभ्यासपूर्ण म्हणणे सादर करणार आहेत. वेतनातील त्रुटी दूर करण्यासाठी पदवीधर शिक्षक यांना Pay Matrix S-१४ ऐवजी Pay Matrix S-१५ हा वेतन स्तर लागू करावा किंवा Pay Matrix S-१४ याच वेतन श्रेणीत एक वेतनवाढ जास्त देऊन वेतनातील तफावत दूर करून आपल्या शिक्षक बांधवांना आर्थिक न्याय मिळवून देणार आहेत, अशी माहिती राज्य कोषाध्यक्ष किशोर वाघ यांनी दिली आहे.

'योग विद्याधाम'तर्फे नगरमध्ये ५ ऑगस्टपासून योग प्रवेश वर्ग

नगर – श्रावण महिन्यात वातावरण शुद्ध झालेले असते. सर्व सृष्टी प्रसन्न निसर्गाने बहरून गेलेली असते. तसेच विविध सणावारांमुळे मानवी मनही उत्साहित आणि श्रद्धेने भरून गेलेले असते. अशा सर्व प्रफुल्लित पार्श्वभूमीवर योगारंभ करण्याचे विशेष महत्व ऋषीमुनींनी आपल्या प्राचीन संस्कृतीत सांगितले आहे. श्रावण महिन्यात सुरू केलेला योगाभ्यास विनासायास साध्य होतो व निरामय आरोग्याचा लाभ होतो असा अनुभव आहे.

या नैसर्गिक संधीचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांना घेता यावा, यारुकताच योग विद्याधाम, नगरने ५ ऑगस्टपासून साधकांच्या सोयीनुसार सकाळी ६, ७ व ८ वाजता तसेच सायंकाळी ४.५ आणि ६ वाजता खास नव्याने योग शिकू इच्छिणाऱ्या साधकांसाठी योग प्रवेश वर्गाचे आयोजन केले आहे.

योग प्रवेश वर्गाचा कालावधी ३५ दिवसांचा असून या अभ्यासक्रमात ४० प्रकारची योगासने, शास्त्रशुद्ध सूर्यनमस्कार, आंकार साधना आणि श्वसनाचा अभ्यास करून घेतला जातो, आरोग्य विषयक ५ व्याख्याने तसेच अभ्यासक्रमाचे पुस्तकही मोफत दिले जाते. प्रदीर्घ अनुभवी आणि योग समर्पित शिक्षक या वर्गाचे संचलन करतात.

योग विद्याधाम गेल्या ३८ वर्षापासून नगर शहरात योग प्रचार आणि प्रसार निरंतरपणे करत आहे, आतापर्यंत हजारो साधकांनी या वर्गाच्या पारंपरिक 'अष्टांगयोग' साधनेचा लाभ घेऊन यौगिक जीवनपद्धतीचा अवलंब केला आहे व विविध व्याधी, आजारांतुन व औषधांच्या त्रासातून मुक्ती मिळवली आहे, याचा लाभ घ्यावा.

माहितीसाठी संपर्क– जयंत वेसीकर ९४२३६ ७६०५९, अनिरुद्ध भागवत ९४२३१६२३४८.

मिलिंद आडसुरे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – उंबरे (ता.राहुरी) येथील रहिवाशी मिलिंद दत्तात्रय आडसुरे (वय ५०) यांचे २ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावातील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई, वडिल, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, भावजयी, पुतणे, विवाहित बहिण, नातवंडे असा परिवार आहे.

श्रीमती इंदुबाई गुगळे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – माणिकनगर येथील रहिवाशी श्रीमती इंदुबाई पेमराज गुगळे (वय ८२, गुगळे पेपर मार्ट) यांचे २ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर ३ ऑगस्ट रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्या अत्यंत धार्मिक व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.

सुभाषचंद चुडीवाल यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर – जाधवमंडी येथील रहिवाशी सुभाषचंद चुडीवाल (वय ७८) यांचे ३ ऑगस्ट रोजी सकाळी ८.१५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कैलासनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल बुंद्येचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आधार बुंद्येचा चौक, जहागिरमार येथे हे पत्र छापून वेबेच प्रसिद्ध केले.

नगरमधील तीनही बसस्थानकास महामानवांची नावे द्यावीत

पतित पावन संघटनेच्यावतीने एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रकांना निवेदन

नगर – गेल्या अनेक वर्षापासून राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकास तेथील परिसराचे नाव देण्यात आले आहे. त्याच नावाने ओळखली जाऊ लागली, तरी तीनही बस स्थानकास महामानवांची नावे द्यावी अशी मागणी पतित पावन संघटनेने विभाग नियंत्रक अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

यावेळी शहराध्यक्ष गोरक्षनाथ सोनवणे, उपाध्यक्ष दिनेश हिरगुडे, नितीन सुराणा, परेश घुगरे, सचिव विराज अडागल्ला, प्रवक्ता घनश्याम बोडखे, संतोष परदेशी, अनिकेत भंडारी आदी उपस्थित होते.

शहरातील राज्य परिवहन महामंडळाच्या तारकपूर बस स्थानकास राजर्षी छत्रपती शाहू महाराज, माळीवाडा बस स्थानकास महात्मा ज्योतीराव फुले, स्वातिस्क चौक बस स्थानकास भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशी नावे देण्यात यावीत, अशी मागणी पतित पावन संघटनेच्या वतीने तमाम नागरीकांच्या वतीने करण्यात आली आहे.

सदर नामकरण केल्यास समाजात जातीय एकोपा निर्माण होईल व एक प्रकारे महापुरुषांना ही आदरांजली ठरेल. त्याचबरोबर बस स्थानकात सर्व महापुरुषांनी समाजाला जी शिकवण दिली आहे. त्याबाबतचे विचार फलक लावल्यास अतिउत्तम जेणेकरुन समाजासाठी त्यांच्या विचारांचा उपयोग होईल व ते भावी पिढीसाठी प्रेरणादायी राहील.

सदर मागणीचा योग्य विचार करुन आपण लवकरात लवकर नामांतराचा निर्णय घ्यावा अन्यथा पतित पावन संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.असे निवेदनात म्हटले आहे निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री व परिवहन मंत्री एकनाथ शिंदे, जिल्हाधिकारी, खा. निलेश लंके, आ. संग्राम जगताप आदींना देण्यात आल्या आहेत.

नगर मधील राज्य परिवहन महामंडळाच्या तीनही बस स्थानकास महामानवांची नावे द्यावी, अशी मागणी पतित पावन संघटने विभाग नियंत्रक अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.

नगरमध्ये २५ ऑगस्टला चर्मकार समाजातील गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

नगर – चर्मकार विकास संघ व लोकनेते माजी आमदार सिताराम्जी घनदाट (मामा) सामाजिक प्रतिष्ठान यांचा संयुक्त विद्यमाने चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या युवक–युवती व समाजबांधवांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली २५ ऑगस्ट रोजी शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे गुणगौरव सोहळा होणार आहे. यामध्ये चर्मकार समाजाचे जिल्ह्यातील इयत्ता दहावी, बारावी, पदवीधर, पीएचडी, एमपीएससी, यूपीएससी विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला जाणार आहे. तर विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या युवक–युवतींचा व समाजबांधवांचा गौरव होणार आहे.

या सोहळ्यासाठी गुणवंत विद्यार्थी, यश प्राप्त करणाऱ्या युवक युवती व समाजबांधवांची माहिती प्रतिष्ठानच्या प्रतिनिधींकडे देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहितीसाठी संतोष कानडे ९७६३९२२०२७, दिलीप कांबळे ७३७३४५४६९०, विनोद कांबळे ९०९६१९९५७१ यांना संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

डॉ.रणजीत सत्रे व सौ.योगिता सत्रे यांचे ४ ऑगस्टला आरोग्य विषयक व्याख्यान

नगर – स्वामी समर्थ जेष्ठ नागरिक मंच भुतकरवाडी परीसर व राजयोग फाउंडेशनतर्फे निवृत्ती नंतरच्या जीवनात मानसिक व शारीरिक आरोग्य कसे चांगले टेवावे या विषयावर डॉ.रणजीत सत्रे व डॉ. योगिता सत्रे यांचे व्याख्यानाचे आयोजन ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता करण्यात आले आहे. सावेडी येथील धन्वंतरी बागे जवळील पालिका हॉल येथे हे व्याख्यान होणार आहे.

या कार्यक्रमासाठी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक मंचाचे अध्यक्ष भीमशंकर लांडे, सचिव आप्पासाहेब बेद्रे, खजिनदार विश्वनाथ जाधव यांनी केले आहे.

गृहिणी

आरोग्य

हायब्लडप्रेशन कंट्रोल करण्यासाठी टिप्स

आठवड्यातून ३-४ दिवस कमीत कमी २० मिनिटाची जॉगिंग करावी. जॉगिंग केल्याने ऑक्सिजन घेण्याच्या प्रक्रियेत सुधार होते आणि ब्लडप्रेशर नियंत्रित राहते. रोज कमीत कमी ३० मिनिटाची ब्रिस्क वॉक करावी. एरोबिक केल्याने हाय ब्लडप्रेशर कमी होते. तणावरहित राहण्यासाठी प्राणायाम कपालभाति करावी.

पाककला

तीळ-शॅलोट्स

साहित्य : १५-२० शॅलोट्स (मद्रासी कांदे), २टे. स्पून तीळ, १ चमचा तिखट, मीठ, जिरे, गरम मसाला, चिंचेचा कोळ २ चमचे,१ चमचा साखर, कोथिंबीर २-३ टे. स्पून, तेल.

कृती : कढईत तेल घाला. त्यात जिरे घाला. शॅलोट्स व तीळ घाला व झाकून एक वाफ द्या. नंतर त्यात तिखट, मीठ, मसाला, चिंच कोळ-साखर घाला. थोडे पाणी (पाव कप) घाला व परत एक वाफ द्या. वरून कोथिंबीर घाला व तीळ भुरभुरा.

वास्तू

दिवाणखाना व चित्र

* जेवणाच्या खोलीचा रंग शांत आणि शीतलता प्रदान करणारा असावा.
* रोज सकाळी उंबरठा स्वच्छ करावा. त्याची हळद-कुंकू वाहून पुजा करावी.
* दिवाणखान्यात कोणते चित्र असावे हे फार महत्त्वाचे आहे. चित्रे आपल्याशी बोलतात. अनेक घटनांचे संकेत देतात. त्यांच्यावर आपली मनःस्थिती अनेकदा अवलंबून असते.

सौंदर्य

लिंबाची साल सुकवून त्याची पावडर करा. एक चमचा पावडरीत दूध, चिमूटभर हळद मिसळून तो लेप सावळ्या त्वचेस लावल्यास त्वचा उजळून निघते.

सल्ला

* बटाट्याच्या जाड साली काढून फेकू नका. त्या तळून मीठ लावून चहासोबत खाण्यास द्या.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

रविवार, दि. ४ ऑगस्ट २०२४

दर्श अमावास्या, दीपपूजन शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, पुष्य १३।२६, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

वृषभ : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न कराल.

मिथुन : भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. वाहने व उपकरणे खराब होण्याची शक्या आहे.

कर्क : घराबाबत कही योजना बनवाल. आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा.

सिंह : आपण जीवनात हव्या असलेल्या वस्तूंवर लक्ष द्याल व पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न कराल.

कन्या : आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे.

तूळ : प्रेमीजनांसाठी आजचा दिवस आनंदाने परिपूर्ण असेल. वाहन अपघाताची शक्यता आहे.

वृश्चिक : व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी समजेल. आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक तणांना कार्यात मिसळाल.

धनु : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. दिवस आनंदात जाईल.

मकर : मित्रांचा सहयोग मिळेल. नोकरीपेक्षा व्यवर्त्तीसाठी पगारवाढीचे योग आहेत.

कुंभ : आपल्या प्रयत्नांमध्ये इतर लोकांची मदत घेतल्याने आपले कार्य सोपे होईल.

मीन : आजचा दिवस आपल्यासाठी नवी सुरुवात करण्यास उपयुक्त आहे. जुन्या मित्रांची भेट होईल.

संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

तक्रारदार : ''जज्ञसाहेब!... विवाह झाल्यापासून माझी पत्नी माझ्या वस्तू फेकत असते.''

जज्ञ : ''असं? विवाह केव्हा झाला?''

तक्रारदार : 'सात वर्षापूर्वी.'

जज्ञ : 'मग या अगोदरच तुम्ही तक्रार का केली नाही?'

तक्रारदार : 'कारण आज प्रथमच तिला नेम बरोबर लागला.'

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



हे विश्व म्हणजे सदोदित बदलणाऱ्या
फेसासारख्ये आहे
मौनाच्या समुद्र पृष्ठावर ते नेहमी तरंगत असते
मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,
मिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ६९८१ सौ.शैलजा कुलकर्णी





शब्दगंध क्र. ६९८० चे उत्तर

आडवे शब्द :- १) कार्यवाहीत आणणे ५) चावण्याचा अवयव; दंत ७) लवकर; मेघ; ढग ९) विधिमंडळाचा सदस्य ११) यशस्विता; भरभराट १३) गोडधोड करून खाण्याचा उत्साहाचा किंवा आनंदाचा दिवस १५) आशीर्वाद; नवरामुलगा १६) काळ्या तोंडाचा शेपटी असलेला एक प्राणी १७) गवळ्याची बायको १८) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी २०) दृष्टादृष्ट २१) इंग्रजी वर्षाचा पाचवा महिना

उभे शब्द :- १) कयास; अनुमान; तर्क २) आशय; हेतू; स्वार्थ ३) दस्ता; कुटण्याचे साधन ४) संशय; शक; संदेह ६) पायधूळ ८) पसरलेला सुगंध ९) मध्ये; अंतर्भागी १०) समर्थ रामदासांच्या पुण्यतिथीचा दिवस १२) पंचांगातील एक भाग; अर्धी तिथी १४) येणे १६) सरळसोट लांब लाकूड किंवा बांबू १९) वर्तमान दिवस; चालू दिवस

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : जर बुद्धिरूपी होडी मनरूपी वाऱ्यास वश झाली; तर ती तुम्हाला तारण्याऐवजी बुडवते. **- लॉंगफेलो.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

स्मृतिभ्रंश कशामुळे होतो?

अपघाताने किंवा अतिशय दुःखदायक बातमी ऐकल्यामुळे काही माणसांना एकाएकी विस्मरणबाधा होते. कित्येकदा तर त्यांना आपल्या भूतकाळातली एकही गोष्ट आठवेनाशी होते. ते कधी कधी आपले नावगावही विसरतात. ही विस्मरणबाधा किंवा स्मृतिभ्रंश (ज्याला इंग्रजीत ॲम्नेशिया म्हणतात) कशामुळे होतो ?

मेंदूस दुखापत, मानसिक धक्का, आत्यंतिक दमणूक, औषधींचा परिणाम, अतिमद्यपान, मादक अमली पदार्थांचे सेवन, म्हातारपण किंवा मानसिक आजार यांमुळे ही बाधा येते. पण कारणे अनेक असली तरी मेंदूवर झालेल्या एखाद्या विशिष्ट परिणामामुळेच अखेरीस विस्मरण होत असते. मेंदूत एका विशिष्ट भागात स्मरणकेंद्र आहे. मेंदूतल्या चेतापेशी आठवणी साठवत असतात. त्यातली नक्की कुठली आठवण कुठल्या वेळी जागृत करायची हे या स्मरणकेंद्राचे काम आहे. यांतल्या स्मरणकेंद्रास दुखापत झाली तर मग अजिबात काहीच आठवत नाही. हे तिजोरीची किल्ही हरवण्यासारखं आहे. म्हणजे आठवणी आहेत पण त्या जागृत करायचा मार्गच नाही, पण जर मेंदूच्या एखाद्या भागाला दुखापत झाली किंवा विशिष्ट घटनेच्या चेतापेशींना दुखापत झाली तर काही घटनाच स्मरणातून तात्पुरत्या पुसल्या जातात. हा पाकीट मारण्याचा प्रकार झाला. खिशातले पैसे गेले, पण बाकीचे सुरक्षित राहिले. अशा प्रकारे आठवण जाण्याचे प्रकार अतिशय भीती किंवा दुःख यामुळे बऱ्याच वेळा घडतात. कालांतराने असे विस्मरण नाहीसे होत असते नि पुन्हा पूर्वीच्या घटना आठवू लागतात.

सज्जनाशी मैत्री

नारायण आचार्यांच्या गुरुकुलात ज्ञानसंपादन करण्यासाठी अनेक शिष्य राहात होते. नारायण आचार्य आपल्या शिष्यांवर चांगले संस्कार होतील अशा कथा सांगत असत आणि शिष्यांच्या मनातील ! शंकांचे निरसन व्हावे म्हणून प्रश्नोत्तराचा कार्यक्रम घेत असत. एकदा असेच सर्व शिष्यांना एकत्र बोलावून ''कोणास काही शंका आहेत का? असल्यास विचारा!'' असे त्यांनी आपल्या शिष्यांना आवाहन केले. त्यावर एका शिष्याने विचारले, ''गुरुजी, आपला सखा मित्र कोणास समजावे?''

त्यावर आचार्य म्हणाले, ''जगात चार प्रकारचे लोक असतात. काही लोक देवाची भक्ती करतात पण त्यांना जो कोणी भेटेल त्यालाही ते देव मानतात: काही लोक देवाची भक्ती करतात पण त्यांचे लोकांशी व्यवहार चांगले नसतात. काही लोक सतत देवाची भक्ती करतीलच असे नाही पण समाजात राहाताना समाजाबरोबर सद्भावनेने वागतात. मात्र काही लोक स्वतः देव मानत नाहीत, त्याला हात जोडीत नाहीत आणि इतरांनाही जोडू देत नाहीत आणि लोकांची पण कदर करीत नाहीत. बघ, समाजात याच चार प्रकारचे लोक दिसतात. या चार पैकी कोणाला कोणत्या प्रकारात बसवायचे, कोणाशी किती संबंध ठेवायचे, कोणाशी किती संबंध ठेवायचे नाही आणि कोणाला मित्र बनवायच हे तुच ठरव!''

हे ऐकल्यावर शिष्य या गोष्टीवर ८ विचार करू लागला. आजपर्यंत हे व्यवहारिक ज्ञान त्याला कोणीच दिले नव्हते. हा जगाचा व्यवहार त्याला नवीन होता. परंतु त्याने या गोष्टीवर बराच विचार केला. मग आचार्यांना म्हणाला,

''पहिल्या प्रकारचा माणूस मैत्री करण्यासारखा आहे.'' त्यावर आचार्य म्हणाले, ''हुशार आहेस. आयुष्यात अशाच लोकांशी मैत्री कर! जे तुला त्रासदायक ठरणार नाहीत.''

तात्पर्य : मैत्री ही नेहमी सज्जनांशीच करावी.

जीवन चक्र

जानेवारी १९७३ मध्ये हुजूर महाराज संत कृपालसिंहजी यांच्याकडून मला बामदान (दिक्षा) अनुग्रह मिळाला. महाराजजींशी माझी भेट ही खुप संक्षिप्त परंतु अविस्मरणीय राहिली. सन १९७४ मध्ये महाराजजींच्या परमधामास पोहचण्यापुर्वीच मी दयाल पुरूष संत दर्शनसिंहजी महाराजजींना संत कृपालसिंहजी महाराजांचे उत्तराधिकारी मानत असे, याचे दोन कारण आहेत. पहिले म्हणजे माझ्यात असणारी आध्यात्मिक अपरिपक्वता, म्हणजे माझे असे म्हणणे होते की, वडीलांनंतर त्यांचा पुत्र (मुलगाच) उत्तराधिकारी असु शकतो. दुसरे असे की संत दर्शनसिंहजी महाराज व माताजीं मला एकत्र भेटले आणि जेव्हा मी त्यांचे अभिवादन करत असे, तेंव्हा ते माझ्या अभिवादनाचे उत्तर असे देत की जणू ते मला पहिल्यापासून ओळखत आहेत. ते मला भाई साहब म्हणून बोलवत असत.

संत कृपालसिंह महाराजजींच्या शरीर सोडण्यानंतर उत्तराधिकारी कोण असणार याबाबत मी देखील त्यापासून दूर राहू शकलो नाही. एक दिवस मी माझ्याच अंधरूणात पडल्या पडल्या विचार करत होतो की, महाराजजींचे खरोखरच कोण उत्तराधिकारी असणार, तेव्हा माझ्या बंद डोळ्यासमोर संत दर्शनसिंहजी महाराजांची एक अस्पष्ट अशी आकृती प्रकट झाली. मला असा विश्वास दृढ करून गेला की संत दर्शनसिंहजी महाराज हेच संत कृपालसिंहजी महाराजजींचे उत्तराधिकारीच्या रूपात कार्य करतील.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

ज्ञानामृत पत्रिका की संयुक्त सम्पादिका ब्रह्माकुमारी उर्मिला बहन भ्राता जगदीश जी के साथ के अनुभव इस प्रकार व्यक्त कर रही हैं मई, २००० में मेरा शान्तिवन परिसर में ज्ञानामृत प्रेस में सेवार्थ आना हुआ। आते ही मुझे जून, २००० की ज्ञानामृत के लिए लेख चयन करने, प्रूफ रीडिंग आदि करने की सेवायें सौंपी गयी। इसके कुछ समय बाद भ्राता जगदीश जी का अचानक शान्तिवन में आना हुआ। उन दिनों इस परिसर में अब की तरह गहमागहमी नहीं थी। थोड़े-से भाई-बहनें थे। भ्राता जी दोपहर के दो या ढाई बजे आये थे।

परिसर में सन्नाटा था। प्रेस भी सूनी-सूनी थी। वे आकर प्रेस के प्रथम ऑफिस में बैठे। किसी ने मुझे बुलाया, कोई और दो-चार दिखे, उन्हें बुलाया और हम ५-७ उनके चारों ओर खड़े हो गये। एक माता ने पानी के लिए पूछा, उन्होंने मना किया। मैं बड़े संकोची भाव से उन्हें बस देख रही थी और सोच रही थी, ऐसी महान हस्ती और इतनी सरलता। हम पाँच-सात को देखते हुए उन्होंने म हावाक्य उच्चारण करने प्रारम्भ कर दिये।

मुझे यह स्वर्ण अवसर जान पड़ा। मैं उनकी एक-एक बात को पूरी एकाग्रता के साथ मन-बुद्धि में लिखती गयी। मैंने महसूस किया, यह एक-एक लाइन ईश्वरीय सेवा में मेरे लिए नींव का काम करेगी। साहित्य के पुरोधा से, साहित्य की उत्कृष्टता के लिए मिली वो मार्गदर्शना इस प्रकार थी, आप जिस स्थान पर खड़े हो, उस स्थान का महत्व जानते हो? यह वह स्थान है जहाँ भगवान के महावाक्यों को लिखा और छापा जाता है।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

साहित्य सहवास - 'लेबल...'

वार्षिक परिक्षेच्या गणिताची प्रश्नपत्रिका परिक्षा हॉलमधील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षकांनी दिली, सोबत उत्तरपत्रिकाही दिली. मुलं, मुली उत्तरं लिहु लागली. शिक्षक बेंचच्या रांगांमधुन हळुवार चालु लागले. नेमकं कोण, काय करतंय हे पाहु लागले. काही मुलं, मुली आधी अवघड गणितं सोडवु लागले तर काही मुलं, मुली आधी सोपी गणितं सोडवु लागले. कोणती गणितं आधी सोडवायची हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. काही मुला, मुलींच्या मते अवघड गणितं आधी सोडवली की सोपी गणितं सोडवायला सोप्पं असतं तर काही मुला, मुलींच्या मते आधी सोपी गणितं सोडवली की अवघड गणितं सोडवण्यासाठी चांगला वेळ मिळतो. सोपं आणि अवघड ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. सोपं आणि अवघड ह्याविषयी व्यक्तीपरत्वे भावना वेगळी आहे.

काही विद्यार्थी फक्त पास होण्यापुरती सोपी गणितं सोडवतात. अवघड गणितं सोडवतंच नाही. कारण गणित आणि इंग्लीश हे विषय अवघड आहेत हे त्यांनी आधीच ठरवलेलं आहे. अवघड गणित सोडवायची नाहीत ह्याचा अर्थ ह्या विद्यार्थ्यांनी अवघड गणितावियी एक विशिष्ठ समज करुन घेतला आहे. खरंतर जे अवघड आहे, ते आधी सोडवलं पाहिजे. ते एकदा सोडवलं की आपला आत्मविश्वास वाढतो, उभारी मिळते. काहींच्या मते अवघड गणितं आधीच सोडावली पाहिजे. तर काहींच्या मते सोपी गणितं सोडवुन नंतर अवघड गणितं सोडवायची. ह्यामुळे आत्मविश्वास वाढतो. 'तू म्हणजे एक अवघडच प्रकरण आहे,' 'अमुक ह्याचं काम अवघड आहे.' ही वाक्यं ऐकली की समजावं सदर व्यक्ती चांगली नाही, योग्य नाही. ह्याठिकाणी अवघड हा शब्द सदर व्यक्तीच्या स्वभाव, बोलण्या-वागण्याविषयी आहे. अवघड हा शब्द मुळातंच काहीतरी कठिण, अशक्य अशा अर्थाचा आहे. मला वाटतं जो अवघड गणितं आधी सोडवतो अशा व्यक्ती यशस्वी झाल्याचं लक्षात येतं. कारण आव्हानं स्वीकारलीच पाहिजेत. सोप्पं गणित कुणीही सोडवेलंच पण अवघड गणितं आधीच सोडवायची ही धारणा, ही मनोवृत्ती अंगी असणं हे निश्चितच कौतुकास्पद, अनुकरणीय आहे. आव्हानं स्वीकारली तरंच आपल्यात जिंकण्याची जिद्द निर्माण होते. जिद्द निर्माण होण्यासाठी अवघड गणितं आधी समजावुन घेतलीच पाहिजेत.

गणित अवघड आहे म्हणून ऑप्शनला टाकु, ही निव्वळ टाळाटाळ करणं आह. आव्हानं स्वीकारलीच नाही तर प्रगती कशी होणार ? शब्दकोडं सोडवतांना अथवा दोन चित्रांमधला फरक ओळखतांना आपला मेंदू कार्यरत होतो. एखादा शब्द अवघड आहे हे माहित आहे पण त्याला समानार्थी शब्द आहेच हे विसरुन चालणारंच नाही. पायवाटेचं मोठ्या रस्त्यात रुपांतर करण्याचं काम ज्यांना मनापासून अवघड गणितं सोडवण्याची आवड आहे, तेच करु शकतात. अवघड काहीच नसतं तर जगण्यात मजा आली असती काय? नक्कीच नाही. सोपी गणितं सोडवण्यासाठी मेंदुचा फारसा वापर करावा लागत नाही. अवघड गणितं सोडवतांना मेंदुचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो.

ह्या ठिकाणी अवघड गणितं म्हणजे आपल्यावर येणारी संकटं आहेत. काही संकटं येणार हे माहीत असतं तर काही संकटं अनपेक्षित येतात तेव्हा मेंदूचा संपूर्णतः वापर करावाच लागतो. त्या संकटावर मात करणं हेच एकमेव, महत्वाचं काम असतं. एखाद्या साध्या संकटावर प्रत्येकजण फारसे कष्ट न घेता मात करु शकतोच पण अनपेक्षित संकट येतं तेव्हा भल्या-भल्यांना घाम फुटतो. एखाद्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती आजारी पडला तर इतर सदस्य हवालदिल होतात.

नेमकं काय करावं हे त्यांना सुचत नाही. अशा वेळी जे काही करायचं आहे हे माझ्या स्वतःसाठी नाही तर घरातल्या प्रत्येकासाठी करायचं आहे हा भाव असायलाच पाहिजे. हाताची घडी घालुन संकट कधीही दूर होणार नाही. घातलेली हाताची घडी सोडवुन संकटाशी दोन हात करता येईलंच. मानलं तर अवघड असतं. अवघड गणितावर पाहुन म नात फक्त म्हणा हे गणित सोप्पं आहे. हे गणित मी सोडणारंच आहे. हाच आत्मविश्वास संकटांवर मात करण्यासाठी महत्वाचा आहे. खरं तर अवघड असं काहीच नसतं. आपलं मन आणि मनातले विचार त्याला अवघडांचं लेबल लावतात. लेबल लावण्याचं काम करुच नका. लेबल लावायचंच असेल तर आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी, सचोटीचं आणि मी जिंकणारंच ह्याचं लावा. एखादा कलाकार फक्त अमुक एक प्रकारचीच भूमिका चांगली करु शकतो हे लेबल लावलं जातं. पण प्रत्यक्षात तो कलाकार वेगळ्या भूमिकाही तेवढ्याच ताकदीने करु शकतो हे लक्षात येतं. अमुक हे अवघडंच आहे हे लेबल लावुच नका.

(लेख क्र.५१२)

- सुनील राऊत माळीगल्ही, मिंगार, अ नगर., मो.९८२२७५८३८३

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

अ) शारीरिक कारणे - १) गर्भाशयाची कमी वाढ २) गर्भाशयामध्ये दोष असणे ३) गर्भाशय ख बंद होणे ४) हार्मोन्समध्ये असंतुलन होणे ५) आंतरजननेंद्रियांना जंतुसंसर्ग होणे ६) गर्भाशय, बीजकोष यांमध्ये गाठी असणे ब) मानसिक कारणे अ) शारीरिक कारणे

१) गर्भाशयाची कमी वाढ : गर्भाशयाची वाढ व्यवस्थित न झाल्याने रजस्त्रावाच्या वेळी स्त्रायूंचे अचानक आकुंचन होते व वेदना होतात.

२) गर्भाशयामध्ये दोष असणे गर्भाशयाला दोन कप्पे असतील, गर्भाशयामध्ये पडदा असेल, तर स्त्रायूंची रचना व वाढ योग्य प्रमाणात नसते. त्यामुळे त्या स्त्रायूंचे कार्यही प्राकृत होत नाही. अशा अवस्थेत स्त्रायू आकुंचन पावताना वेदना होतात.

३) गर्भाशयमुख बंद होणे जर गर्भाशयाचेमुख अगदी सुईएवढे असेल किंवा फारच अरुंद असेल तर पाळीच्या वेळेस होणारा रजःस्राव बाहेर पडण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे गर्भाशयाच्या स्त्रायूंना रजःस्राव टाकण्यासाठी जास्त वेळा आकुंचन करावे लागते आणि वेदना जास्त होतात.

(क्रमशः)

- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

कोपरगाव येथे आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत नारसमीळ सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचे यशस्वी विद्यार्थी. समवेत विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सेंट विवेकानंद स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

नगर – कोपरगाव येथील श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये आयोजित केलेल्या पश्चमूण कस्परसीमाई सोमैया राज्यस्तरीय मराठी वक्तृत्व स्पर्धेत राज्यातील ३५ शाळेतील ७० विद्यार्थ्यांनी आपले वक्तृत्व सादर करून स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवला. त्यात नारसमीळ सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील शौनक ऋषिकेश कुलकर्णी व सर्वज्ञा अविनाश कराळे यांनी उत्कृष्ठ वक्तृत्वाने सर्वांची मने जिंकून दुसरा क्रमांक पटकावला व तीन हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मिळवले. या विद्यार्थ्यांना शाळेच्या मराठी विभाग प्रमुख सीमा कोटस्थाने, शिक्षिका सुमन कदम व अमोल धोपावकर यांचे मार्गदर्शन मिळाले.

सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलला २३ जुलै रोजी श्रीरामपूर येथील सेंट झेवियर्स इंग्लिश स्कूलने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत पाचवे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

पलक राहुल पाटणी आणि अमोघ समीर पळसकर यांनी आपली भाषणे अतिशय उत्कृष्ट पद्धतीने सादर केली. त्यांना शिरीन शेख, मनीष आहुजा, आशा रंगलानी, दिव्या पोखर्णा, समिना पटेल, गीता दुमाटे यांनी मार्गदर्शन केले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी लोकमत कॅम्पस क्लब आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेतही चमकदार कामगिरी केली. गट क्रमांक २ मध्ये प्रणील अमोल थिगळे याला तृतीय क्रमांकाचे १५०० रुपये रोख व प्रशस्तीपत्र असे बक्षीस मिळाले. स्पर्धेमध्ये शहरातील विविध शाळांतील ६२९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. थिगळे याला कला शिक्षक अनामिका म्हस्के यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, हरेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरनानी, प्राचार्या गीता तांबे, उपप्राचार्य व पूर्व प्राचार्यमध्यक्ष मुख्याध्यापिका वांचन पापडेजा, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका गोदावरी कित्तानी यांच्यासह शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

संत नामदेव महाराजांनी आपल्या कार्यातून समाजाला दिशा दिली

बाळासाहेब बोराटे यांचे प्रतिपादन; संत नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त सावेडी येथील मंदिरात सर्वरोग निदान, रक्तदान शिबिर, शोभायात्रा

श्री संत नामदेव महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त सावेडी, शिंदे मळा येथे परिसरातून शोभायात्रा काढण्यात आली यावेळी सर्व समाज बांधव सहभागी झाले होते

नगर – भगवंत नामाने जीवनातील दुःख कमी होऊन आनंद निर्माण होत असतो. हेच संतांनी मनुष्याचे जीवन सुखी-समृद्ध होण्यासाठी आपल्या सत्वचनातून मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या वचनांप्रमाणे मनुष्याने वाटचाल केल्यास कोणत्याही प्रकारच्या अडचणी येत नाहीत. संत नामदेव महाराजांनी कार्यातून समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने सावेडी परिसरातील या मंदिरात विविध कार्यक्रमातून धार्मिक वातावरण निर्माण होत आहे. त्याचबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे. धार्मिक कार्यातून समाजाचे मोठे संघटन उभे राहत आहे. अशा कार्यात आपले सदैव योगदान राहील, असे प्रतिपादन माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले.

श्री संत नामदेव महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त सावेडी, येथे परिसरातून शोभायात्रा काढण्यात आली होती. यावेळी ट्रस्टच्या अध्यक्षा प्रमिला दुमाटे, उपाध्यक्ष दिलीप काकडे, सचिव राजू बगाडे, कृष्णा भस्मे, सुरेश लोळगे, राजू पाटकुले, महेश चोपडे, हेमा वडे, विनोद काकडे, किशोर वायचळ, अनिल वाव्हळ, कोशल चुंबळकर, प्रवीण पाटसकर, सुधीर नेवासकर, प्रफुलत्ता काकडे, नगरसेवक बालासाहेब बोराटे, परेश लोखंडे, नितीन शेलार, राजेंद्र बारस्कर आदी उपस्थित होते

ट्रस्टच्या अध्यक्ष प्रमिला दुमाटे म्हणाल्या कि संत नामदेव महाराज यांनी जगाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांनी सामान्यांसाठी केलेले कार्य अनमोल व महान आहे. त्यांच्या कार्याचा वारसा असाच पुढे चालू राहिला पाहिजे. याच उद्देशाने श्री संत नामदेव महाराज शिंपी समाज ट्रस्टच्या माध्यमातून शिंदे मळा येथे मंदिर उभारण्यात आले असून, त्या ठिकाणी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

जयंती व पुण्यतिथीनिमित्त सप्ताहभर धार्मिक कार्यक्रमाबरोबर सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकांचा विकास साधला जात आहे. आज आरोग्य शिबीरात मोफत तपासणी करून समाजाचे स्वास्थ्य अबाधित राखण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन ट्रस्टच्या अध्यक्ष प्रमिला दुमाटे यांनी केले.

प्रास्ताविकात दिलीप काकडे म्हणाले कि, श्री संत नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त गेल्या सात दिवसांपासून या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध किर्तनकारांची किर्तने, प्रवचने, ज्ञानेश्वरी पारायण झाले. संत नामदेव भजनी मंडळाचे भजन होत. पुण्यतिथीदिनी परिसरातून दिंडी निरवणुक काढण्यात आली. हभप मछिंद्र महाराज राऊत यांचे काल्याचे किर्तन झाले. तसेच स्वास्थ्य हॉस्पिटलच्यावतीने सर्वरोग निदान व जनकल्याण रक्तपेढी यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. या सर्व धार्मिक व सामाजिक उपक्रमांचा समाजातील बंधू-भगिनींनी लाभ घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश लोळगे यांनी केले तर आभार राजू बगाडे यांनी मानले. कार्यक्रमास अशोक वडे, अशोक सातपुते, डॉ. संजय पतंगे, अशोक वाव्हळ, दिलीप पतंगे, अक्षय माळवदे, राजेंद्र बुलबुले, नितीन बगाडे, जयश्री सातपुते, रमेश खोले, निर्मला लोळगे, क्रांती काकडे, कोमल चोपडे, वंदना काकडे, सुवर्णा भस्मे, मनीषा बोथे, बंटू काकडे, प्राजक्ता लोळगे, निलेश चोपडे, अक्षय लोळगे, राजश्री बुलबुले, विना खोले, सुभाष बगाडे, सुनंदा चोकटे, पी.एस.आय उमेश पतंगे, राजू लिंमकर, अशोक होमकर, राजश्री धोकटे, गोविंद बारटक्के, चंदन बारटक्के, हेमंत शिंदी, हरिदास वडे, राजू बोडगे, बळीराम सातपुते, संजय काकडे, संजय पाटसकर आदी उपस्थित होते.

मुलांनी पालकांना व्यसनापासून रोखावे

युनूस तांबटकर यांचे प्रतिपादन

नगर – युवा पिढी दिवसेंदिवस तंबाखू, गुटखा मावा धुम्रपानाच्या मोठ्या प्रमाणात आहारी जात आहे. व या व्यसनाच्युळे पिढी जीवनाला मुकत आहे. त्यांचे कुटुंबे उघडी पडत आहे. तरी युवक व्यसन सोडत नाही असे निदर्शनास येत आहे. तरी त्यांच्या मुलांनी घरामध्ये आपल्या पालकांना व्यसनापासून रोखण्याचे धाडस करून त्यांना आग्रह करून व्यसनापासून रोखावे असे आवाहन रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष व व्यसनमुक्तीचे प्रवक्ते युनूसभाई तांबटकर यांनी केले.

मखदूम सोसायटी व रहेमत सुलतान फॉउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करताना व्यसनमुक्तीचे प्रवक्ते युनूस तांबटकर.

मख़दूम सोसायटी व रहेमत सुलतान फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन व मराठा सेवा संघाच्यावतीने व संजय झिंजे, आर्किटेक्ट अर्शद शेख, निलेश महाजन, सुनील रोजमॅन, अभिजीत गायकवाड, प्रफुल्ल सोनवणे, नरेश पेवाल आदी दानशुरांच्या सहकार्याने छावणी परिषदेच्या महात्मा गांधी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आले. यावेळी रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, मुबीना बाजी, सुमैय्या सय्यद आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना युनुस भाई म्हणाले की, व्यसनाने संपूर्ण जगाला आपल्या विळाख्यात घेतलेले आहे. त्यामध्ये भारतात तर जास्तच व्यसनतेचे प्रमाण वाढत चालले आहे. व त्याचे परिणाम दिर्घ कालापर्यंत भोगावे लागत आहे. तरी या व्यसनाचे नाद कसे संपवता येईल याकडे लक्ष देण्याची अत्यंत गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मूबीना बाजी यांनी केले. तर सुमैय्या सय्यद यांनी आभार मानले.

'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांना इन्फ्लुन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड पुरस्कार

महिमा जैन यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. उद्धव शिंदे. समवेत मंत्री मंगलप्रभात लोढा, चीफ एडिटर जयेश भट्ट.

नगर – स्नेहबंध सोशल फॉडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांना वंचित, निराधारांसाठी नि:स्वार्थ भावनेने करत असलेल्या सामाजिक कार्याबद्दल इन्फ्लुन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड पुरस्कार मुंबईत प्रदान करण्यात आला. मुंबईतील समारंभात हा पुरस्कार डॉ. उद्धव शिंदे यांनी राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा, चीफ एडिटर, महिमा जैन, चीफ एडिटर जयेश भट्ट, मिनाक्षी छभ्रंया यांच्या हस्ते स्वीकारला. पदक, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ओळखपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

डॉ. उद्धव शिंदे हे स्नेहबंध सोशल फॉडेशनच्या माध्यमातून समाजातील गोरगरीब व गरजू व्यक्तींना मदतीचा हात देत सामाजिक कार्य करत आहे, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन, दिव्यांगसाठी मदत, गरजू शालेय मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप असे अनेक समाजोपयोगी कार्य करत आहेत. ही कौतुकास्पद बाब आहे, असे यावेळी आयोजकांनी सांगितले.

के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना अभिवादन करताना डॉ. स्वाती मुनोत व प्राध्यापकवर्ग.

के. जी. महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

नगर – के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा.डॉ.स्वाती मुनोत यांनी अध्यक्षीय भाषणात लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान व अण्णाभाऊ साठे यांच्या समाजकार्याची व त्यांच्या साहित्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्रा.आरती खेडकर यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी महत्व विशद केले.

प्रा. सविता चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर आभार सौ. अमृता मुळे यांनी मानले.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. डॉ. वर्षा कीतने, प्रा.डॉ.प्रशांत खोपटीकर, प्रा.स्नेहल बोरावके, संस्थेचे कार्यालयीन अधीक्षक संतोष मुनोत, सौ. हर्षाली ससकर व विद्यार्थी उपस्थित होते.

नवनवीन तंत्रज्ञान व कौशल्य आत्मसात केल्यास रोजगार उपलब्ध होईल

सौ. अनघा राऊत यांचे प्रतिपादन

सकल माळी समाज ट्रस्ट आयोजित कार्यक्रमात नवीन उद्योजक व व्यापारी यांना सौ.अनघा राऊत यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला.

सकल माळी समाज ट्रस्ट तर्फे नवीन उद्योजक व व्यापारी युवकांना मार्गदर्शन

नगर – सकल माळी समाज ट्रस्टच्या वतीने नवीन उद्योजक व व्यापारी यांना मार्गदर्शन करण्यात येते. ही कौतुकास्पद बाब आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर १८७० साली अमेरिकेला कडाडून जग आली. तेव्हा जगातील सर्व बाजारपेठ जपानी वस्तूंनी व्यापलेली होती. जपानमध्ये बॉम्बस्फोट होऊनही जपानने गुणवत्तेच्या जोरावर संपूर्ण बाजारपेठेत नाव केले आहे. आयआयटीमध्ये शिकणारे विद्यार्थी हुशार असूनही ३८ टक्के बेरोजगार आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर कामगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाला. परंतु आता डिजिटल क्रांतीनंतर अनेक लोक बेरोजगार होत आहेत. येणाऱ्या काळात नवनवीन क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान व कौशल्य आत्मसात केल्यास रोजगार उपलब्ध होईल, असे प्रतिपादन विझार्ड कॉम्प्युटरच्या संचालिका सौ. अनघा राऊत यांनी केले.

सकल माळी समाज ट्रस्ट आयोजित युवकांना व उद्योजकांना मार्गदर्शन कार्यशाळा झाला. याप्रसंगी सौ.अनघा राऊत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सकल माळी समाज ट्रस्टचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे, रविंद्र राऊत, विश्वस्त डॉ. रणजीत सत्रे, माळी वधू वर सूचक केंद्राचे अध्यक्ष अशोक हिंगे, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे, अमोल भांबरकार, चंद्रकांत पुंड, मनोज बनकर, रोहित पठारे, सौ.रेणुकाताई पुंड, गणेश कोल्हे, निलकंठ विधाते, संजय ताजणे, सतीश भुजबळ, किशोर फुलारी, डाके मॅडम आदी उपस्थित होते.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, समाजातील उद्योजक व व्यापाऱ्यांना दिशा देण्याची गरज आहे. युवकांना योग्य ते मार्गदर्शन मिळाल्यास ते यशस्वी उद्योजक व व्यापारी होतील. नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी. यासाठी वक्ते मार्गदर्शन करत असतात.

कार्यक्रमात सूत्रसंचालन राजेंद्र पडोळे यांनी केले. तर आभार अनिल इवळे यांनी मानले.

भगवान शंकर पंढरीचे पहिले वारकरी

हभप निळकंठ देशमुख यांचे प्रतिपादन; श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नामसप्ताह सोहळा सुरु

नगर – श्रीक्षेत्र काशीची निर्मिती केल्यानंतर पंढरपूरची निर्मिती करण्यात आली. भगवान शंकराने पंढरीची पहिली वारी केल्याने पांडुरंग (भगवान विष्णू) प्रसन्न झाले. त्यांनी भगवान शंकरांना डोक्यावर घेतले. आजही पांडुरंगाच्या डोक्यावर शिव विराजमान आहेत. पंढरीच्या वारीस १८०० वर्षांची दिर्घ परंपरा आहे. वारीचा आनंद आजच्या संगणक युगातही उच्चविद्याविभूषित लुटत आहेत. हेच वारीचे विशेष आहे, असे हभप निळकंठ देशमुख यांनी सांगितले.

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नामसप्ताह सोहळ्यात प्रवचनाचे पुष्प गुंफताना ते बोलत होते. डावरे गल्लीतील श्रीनामदेव विठ्ठल मंदिरात सालाबादप्रमाणे हा सोहळा सुरू आहे. मंदिराचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कवितकर यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष महेश जाधव, ज्ञानेश्वर पवार, प्रसाद मांदरे यांच्यासह श्रोतवृंद प्रवचनास उपस्थित होता. महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

श्री.देशमुख महाराज पुढे म्हणाले, संत एकनाथ महाराजांनी 'माझे माहेर पंढरी आहे भीवरेच्या तीरी...' या अभंगामध्ये माझे बाप विठ्ठल आणि आई रखूमाई असल्याचे म्हटले आहे तर तुकोबांनी 'चला पंढरीस जावू. रखुमाईवीवरा पाहू...' 'जे सर्व तीर्थांचे माहेर. सर्व सुखांचे भांडार...' 'जन्म नाही रे आणिक तुका म्हणे ही माझी भाक..' अशा अनेक अभंगातुन पंढरपूरचे वर्णन केले आहे. पंढरपूर क्षेत्राचे महत्त्व वर्णन करताना ते पुढे म्हणाले, सर्व संतांनी पंढरपूरला 'माहेरचा मान' दिला आहे. नामदेव महाराज म्हणतात, 'आम्हा दिनाचे माहेर' याचा अर्थ माहेर हे कन्येचे सर्वात आवडते स्थळ. माहेर हे प्रथम तिचे जन्म स्थळ असते. तेथे तिला आई-वडीलांचे प्रेम मिळालेले असते. भाऊ, बहिणी, मैत्रीणींचे प्रेम मिळालेले असते. ती कन्या, वधू, आई,आजी या सर्व भुमिका पार पाडल्यानंतरही माहेर विसरत नाही, हीच गोष्ट आपल्या संतांची आहे. लौकिक अर्थाने जन्म मातेच्या पोटी होत असला तरी त्यांतील आत्मतत्त्व, चैतन्य घालणारा पांडुरंग परमात्मा आहे, हे संत जाणतात. जे प्रेम माता-पित्याकडून मिळते त्यापेक्षा अनंत पटीने प्रेम भगवंताचे असते.

डावरेगल्लीमधील श्री नामदेव विठ्ठल मंदिरात प्रवचन करताना हभप निळकंठराव देशमुख महाराज.

ज्याप्रमाणे आई-वडिलांना मुलीच्या भेटीची ओढ असते, तशी विठ्ठलाला देखील आपल्या भक्तांना भेटण्याची ओढ असते. 'आषाढी, कार्तिकी विसरू नका,,, सांगतसे पुंडु पांडुरंग' 'तिन्ही त्रिभुवनी नाही कोणी मज रुपे चक्रपाणी माय्यासी...' 'जावे पंढरीसी आवडे मानसी. तुका म्हणे ऐसे आर्त ज्याचे मानसी. चक्रपाणी त्याची वाट पाहे...' हेच प्रेम भक्त आणि भगवंतामध्ये आहे म्हणून सर्व संतांना पंढरीची, माहेरची ओढ आहे.

पंढरपूरचे वैभव आहे की, 'आधी रचली पंढरी, मग वैकुंठ नगरी. जेव्हा नव्हते चराचर तेव्हा होते पंढरपूर. जेव्हा नव्हती गोदा, गंगा तेव्हा होती चंद्रभागा....' पंढरपूरचे वर्णन भु वैकुंठ म्हणून केले आहे. यातला बारकावा असा आहे की, जर एखादा वैकुंठाला गेला तर परत खाली येत नाही. परंतु पंढरपूर हे वैकुंठ पण, भु वैकुंठ असल्यामुळे खुप, मोठे, समाधान, आनंद, धेछन घरी येता येते. भक्तांनी याकरता जेव्हा जमेल तेव्हा विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरीची वारी करावी. या वारीचे एक महत्व म्हणजे, 'पंढरीची वारी आहे माझे घरी आणिक तीर्थ दर नाही...' अर्थात जो नित्य नेमाने पंढरीची वारी करतो त्याला इतर कोणतेही व्रत करण्याची जरूरी भासत नाही. कारण वारी हेच मुळी खुप मोठे तप आहे.

'विठ्ठल' या शब्दातील 'वि' म्हणजे विषयाचा त्याग केला की, विठ्ठलाची भेट. विवेकाची प्राप्ती होते. विषय तो त्याचा झाला नारायण ही अवस्था येणे महत्वाची. दोन 'ठ', 'ठ' ठाव ठिकाणा अर्थात कोहम, मी कोण? कोठून आलो? कशाला आलो? काय करीत आहे? कोठे जायचाचे? याचे ज्ञान होते. मार्ग सापडतो. म्हणून पंढरपूर क्षेत्र महत्वाचे अशा अनेक गोष्टींचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी पंढरीची वारी श्रेष्ठ हे अनेक उदाहरणं आणि दाखले देवुन श्री.देशमुख महाराजांनी सांगितले. ते रुकताना उपस्थित सर्व भान हरपून गेले होते. चिंतनातील आनंदाची अनुभूती उपस्थित सर्वांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसत होती.

विळद घाट येथील डॉ. विखे पाटील कृषी महाविद्यालय व उत्तरप्रदेश टेस्टबुक एज्यु सोल्यशन प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार झाला. याप्रसंगी आशिष वाडेकर व प्राचार्य डॉ. एम. बी. धोंडे कंपनीचे प्रतिनिधी, प्राध्यापक आदी (छाया – विजय मते)

डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालय व टेस्टबुक एज्यु सोल्युशन प्रा. लि. यांच्यात सांमजस्य करार

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फॉडेशनचे कृषि महाविद्यालय व उत्तरप्रदेश येथील टेस्टबुक एज्यु सोल्युशन प्रा. लि. यांच्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी सामजस्य करार करण्यात आलेला आहे. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय, राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा, सरलसेवा परीक्षा, प्रशासकीय सोबतच वनविभागातील स्पर्धात्मक प्रशिक्षण आणि आयबीपीएस बँकींग इतर क्षेत्रात संधी असणाऱ्या विविध परीक्षाचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये मॉकटेस्ट, टेस्टसीरीज देण्यात येणार असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील पर्याय निवडण्याची संधी देण्यात येणार आहे व नंतर त्या अनुषंगाने तज्ञाचे मार्गदर्शन व व्याख्यान आयोजीत केले जाणार आहे. सद्या १ वर्षाकरीता विद्यार्थ्यासाठी पूर्णपणे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या कराराचर टेस्टबुक एज्यु सोल्युशन प्रा. लि.,चे आशिष वाडेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. धोंडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धोंडे म्हणाले, जीवनात यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम, अभ्यासात सातत्य, जिद्द, चिकाटी या गोष्टी महत्वाच्या असून स्पर्धेच्या युगात प्रशिक्षणाव्दारे सातत्य ठेवून आपले स्वप्न पूर्ण करावीत. तसेच विद्यार्थ्यांनी या ऑफलाईन/ऑनलाईन कोर्सचा फायदा नियमित अभ्यासक्रम सांभाळून उचित ध्येय पूर्ण करण्यासाठी नक्कीच होईल.

या उपक्रमात महसूल व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व डॉ. सुजय विखे पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे प्रभारी सेक्रेटरी जनरल डॉ. पी.एस. गायकवाड, उपसचालक (तंत्र) प्रा. सुनिल कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्रात भावनिक एकात्मता जपण्याचे काम श्री संत नामदेव महाराजांनी केले

ज्ञानेश्वर कविटकर यांचे प्रतिपादन; श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नामसप्ताह सोहळा उत्साहात

नगर – नामदेव महाराज हे वारकरी संप्रदायाचे प्रचारक होते. नामदेवांचे व नामविठोचे आद्य प्रणेते असलेले महाराष्ट्रातील हे एक थोर संत होत. आपल्या कीर्तनकलेमुळे प्रत्यक्ष पांडुरंगाला डोलायला लावणारी अशी त्यांची कीर्ती होती. संत नामदेव हे वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक म्हणून भारतभर फिरून त्यांनी भावनिक एकात्मता व समाज प्रबोधनाचे काम केले. भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत नेऊन त्यांनी पोहोचवली. त्यांचे बालपण हे पंढरपुरात गेले. लहानपणापासूनच श्रीविठ्ठलाची भक्ती त्यांनी केली.'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. महाराष्ट्रात भावनिक एकात्मता जपण्याचे काम त्यांनी केले. संत नामदेव हे कीर्तने करत भारतभर फिरले, असे प्रतिपादन श्री नामदेव शिंपी समाज ट्रस्ट (विठ्ठल मंदिर, डावरे गल्ली) अध्यक्ष ज्ञानेश्वर कविटकर यांनी केले.

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नाम सप्ताह सोहळ्यानिमित्त श्री नामदेव विठ्ठल मंदिर (डावरे गल्ली) व शिंपी समाजाच्यावतीने नामदेव महाराजांच्या पालखी सोहळ्याप्रसंगी नामदेव शिंपी समाज ट्रस्ट (विठ्ठल मंदिर, डावरे गल्ली) चे अध्यक्ष ज्ञानेश्वर कविटकर, उपाध्यक्ष महेश जाधव, सचिव अभिजीत पाळंदकर, अजय कविटकर, उमेश गीते, ज्ञानेश्वर पवार, शरद गीते, सुरेश चुटके, अरुण जवळकर, सुजित चांडवले, महेश गीते, नामदेव सांस्कृतिक महिला मंडळ व रामस्त नामदेव शिंपी समाज बांधव. (छाया – समीर मन्यार)

श्री नामदेव विठ्ठल मंदिर डावरे गल्ली येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नाम सप्ताह सोहळ्याच्या समारोपप्रसंगी श्री. कविटकर बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष महेश जाधव, सचिव अभिजीत पाळंदकर, अजय कविटकर, उमेश गीते, ज्ञानेश्वर पवार, शरद गीते, सुरेश चुटके, अरुण जवळकर, सुजित चांडवले, महेश गीते, नामदेव सांस्कृतिक महिला मंडळ व रामस्त नामदेव शिंपी समाज बांधव उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. कविटकर म्हणाले की डावरे गल्ली येथील श्री नामदेव विठ्ठल मंदिर हे पुरातन मंदिर आहे येथे गेल्या पन्नास वर्षांपासून अविरहित पणे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन केले जाते. या सप्ताह अंतर्गत भजन, कीर्तन, प्रवचन, हनुमान चालीसा अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करुन समारोपप्रसंगी टाळ मृदुंगाच्या गजरात श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांची पालखीतून परिसरात मिरवणूक काढण्यात आली. टिकठिकाणी नागरिकांनी पालखीचे स्वागत केले. परिसरातील वातावरण भक्तिमय झाले होते असे ते म्हणाले.

ट्रस्टचे उपाध्यक्ष महेश जाधव म्हणाले की अतिशय भक्तिमय वातावरणात श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नाम सप्ताह सोहळा पार पडला. यावेळी परिसरातील भाविकांना ट्रस्टच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

के.के. शेट्टींचा भारत भारतीच्या वतीने सत्कार

उद्योजक के.के. शेट्टी यांना आर्यभट्ट आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल भारत भारतीच्या वतीने त्यांचा सत्कार करताना रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी. समवेत अध्यक्ष कमलेश भंडारी, उपाध्यक्ष रमेश रासने, अशोक मवाळ, राजू लक्ष्मण, हरिष हरवाणी, मिलिंद कुलकर्णी, दिनेश देवी, रामेश्वर बिहाणी, चंद्रकांत पंडित, संजय आठेय, सतीश गवळी, संदीप कोट्टे आदी.

५ ऑगस्ट रोजी मासखमण पचकावणी

नगर – प्रवर्तक श्री. कुंदनऋषीजी महाराज प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषीजी महाराज नवकार साधक उपप्रवर्तक श्रमण संघीय सलाहकार महाराज अनमज्ञाता डॉक्टर श्री सुयोगऋषीजी महाराज आदिठाणा ४, श्री श्रुतमुनिजी म.सा., श्री सत्यप्रभाजी म.सा. व्याख्यानी श्री उदयप्रभाजी म.सा. सेवाभावी श्री. वरणप्रभाजी म.सा. यांच्या साक्षिध्यात मासखमण होणार आहे.

मुकेशलाल मुथियान

आचार्य भगवंत राष्ट्रसंत श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या जन्म महोत्सव प्रेरणेने मुकेशलाल दगडुलाल मुथियान (मास्टर मुकेश) यांचे १४ वे मासखमण ५ ऑगस्ट रोजी तिलोकरत्न धार्मिक परीक्षा बोर्ड आनंदधाम येथे ३१ उपवासाची (मासमखण) पचकावणी होत आहे, तरी आपणा सर्व बंधू–भगिनींनी या जन्म महोत्सवात सामील व्हावे.

मास्टर मुकेश यांनी यापूर्वी १३ मासखमण केलेले आहे. आता त्यांचे हे १४ वे मासखमण आहे. त्यांनी यापूर्वी २८ वेळा (आठ उपवास) अठाई तसेच २ वेळा ११ उपवास केले आहे. तसेच त्यांचे १२ वे वार्षितप चालू आहे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात तपस्या जैन धर्माच्या आराधना करणाऱ्या व्यक्तिस आशिर्वाद देण्यास सकल संघाने पचकावणीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती सावेडी गावठाण व युवक काँग्रेसच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रारंभी अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष मोसीम शेख, दीपक नेटके, उत्सव समितीचे अध्यक्ष पप्पू मिंगारदिवे, सोनू नेटके, हर्षल नवरिरे, सागर इरमल, समीर शेख, अनिल अल्हाड, योगेश मिंगारदिवे, सुमित साळवे, गौरव साठे आदी.

सायकलिंग खेळास सर्व सहाय्य करणार : खासदार सुनेत्रा पवार

नगर – सायकलिंग खेळात महाराष्ट्राच्या सायकलपटूंनी गत पाच वर्षात नेत्रदिपक कामगिरी केली असून आंतरराष्ट्रीय स्पर्धात महाराष्ट्रचे सायकलपटू आपला ठसा उमटवत आहेत ही महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन बारामतीच्या राज्यसभा खासदार सौ. सुनेत्रा पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवसानिमीत्त सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे ते बारामती राष्ट्रीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभानंतर एशियन सायकलिंग कॉन्फडरेशनचे महासचिव ओंकार सिंग, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव मनिंदर पाल सिंग, उपाध्यक्ष प्रताप जाधव तसेच प्रविण पाटील यांना सौ. पवार यांनी 'जिजाई'वर आमंत्रित करुन चर्चा केली.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे ते बारामती राष्ट्रीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या उद्घाटनानंतर एशियन सायकलिंग कॉन्फडरेशनचे महासचिव ओंकार सिंग, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव मनिंदर पाल सिंग, उपाध्यक्ष प्रताप जाधव तसेच प्रविण पाटील यांना सौ. पवार यांनी 'जिजाई'वर आमंत्रित करुन त्यांचा सत्कार करताना राज्यसभा खा. सौ. सुनेत्रा पवार.

दुर्दैवाने महाराष्ट्रामध्ये एकही सराव आणि स्पर्धेसाठी सायकलिंग व्हेलोड्रम नसताना महाराष्ट्राचे सायकलपटू आंतरराष्ट्रीय ट्रॅक स्पर्धामध्ये चमकदार कामगिरी करत असल्याचे याप्रसंगी सीएफआय चे महासचिव मनिंदर पाल सिंग यांनी सांगितले. येथे खूप चांगली मुणवत्ता असून महाराष्ट्रामधील सायकलपटूंना योग्य सुविधा व सोयी मिळाल्यास आगामी काळात ते आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये सातत्याने पदक जिंकतो कामगिरी करतील असा विश्वास ओंकार सिंग यांनी यावेळी व्यक्त केला आणि महाराष्ट्रातील सायकलिंग खेळाच्या हितासाठी या खेळामध्ये सक्रीय होण्याबद्दल सौ. सुनेत्रा पवार यांना विनंती केली. सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे प्रताप जाधव यांनी महाराष्ट्रामधील सायकलपटूंच्या कामगिरीची माहिती यावेळी सौ. पवार यांना दिली.

येणाऱ्या काळात आपण महाराष्ट्रामधील सायकलिंग खेळामध्ये लक्ष घालू आणि सायकलपटूंच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहू असे आश्वासन सौ. सुनेत्रा पवार यांनी याप्रसंगी उपस्थितांना दिले.

विविध स्तरावरील स्पर्धांच्या आयोजनाबर आपला भर राहणार असल्याचे सांगून खेळाडूंना अनुभव येण्यासाठी दर्जेदार राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांचे जास्तीत जास्त आयोजन करण्यावर त्यांनी भर दिला. सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडियाच्या वतीने स्मृतिचीन्ह देऊन सौ. सुनेत्रा पवार यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

भरीव विकासकामांमुळे शहराच्या विकास रथाचे चाक अडणार नाही

आ. संग्राम जगताप

नगर – नगर शहरात १५० कोटी रुपये निधी वापरून भरीव अशी विकास कामे होत आहेत. सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण करून तयार केले जात आहेत. अमृत योजना कार्यान्वित करून पिण्याचे पाणी घराघरात आणि औद्योगिक क्षेत्रात पोहोचवले जात आहे. या भरीव अशा विकास कामामुळे शहराच्या विकास रथाचे कुणाचेच चाक अडणार नाही, असे आ. संग्राम जगताप यांची सांगितले.

केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट इथे नगर–पुणे रोड ते थेट भूषणनगर लिंक रोडला जोडणाऱ्या रस्त्याचे काम मंजूर झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करून आ. संग्राम जगताप यांनी भरीव असा दीडशे कोटी रुपयांचा निधी आणला आहे. या अंतर्गत नगर शहरातील ८ मुख्य रस्ते सिमेंट काँक्रीटचे ९ मीटर रुंदीचे होणार आहेत. यांच अंतर्गत केडगाव इंडस्ट्रियल इस्टेटमधून थेट भूषणनगर लिंक रोडला जोडणाऱ्या अंतर्गत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ शुक्रवारी करण्यात आला.

इंडस्ट्रियल इस्टेट अंतर्गत लिंकरोडपर्यंत रस्ता कामाचा जे.सी.बी.ची पूजा करून श्रीफळ वाढवून शुभारंभ करताना आ. संग्राम जगताप. (छाया – लहू दळदी)

इंडस्ट्रीयल इस्टेट अंतर्गत लिंक रोड पर्यंत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे पदाधिकारी आणि पालिका अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जेसीबीची पूजा करून या रस्त्यावर नारळ फोडण्यात आले. यावेळी आ. संग्राम जगताप, मनपा आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गणेश भोसले, अहमदनगर महापौर को–ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष व माजी नगरसेवक संजय चोपडा, चेअरमन अरविंद मुंदेवा, व्हाइस चेअरमन निलेश मेहेर, सेक्रेटरी संतोष बोरा, संतोष बोधरा, संतोष गुगळे, मेहुल भंडारी, नितीन पटवा, आनंद देसरडा, सुनित मुनोत, सतीश बोरा, नरेश गांधी, प्रीतम गांधी, दिलीप कटारिया, प्रणव कटारिया, अनुप काळे, सुहास शिरसाठ, कॉन्ट्रॅक्टर काकासाहेब थोरात, सतीश बोरा, मनीषा गिरी, अमृत मुथीयान, मनोज पारखे, श्रीकांत निंबाळकर, आदित्य बह्राळ, जयेश कोके, बाळु गुगळे, शशीकांत नजान उपस्थित होते. भूमिपुजन झाल्यानंतर इंडस्ट्रियल इस्टेट सोसायटीच्या कार्यालयात सत्कार सोहळा झाला.

यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप पुढे म्हणाले की, नगर शहर बदलते आहे. विकासाच्या प्रगतीपथावर आहे. दीडशे कोटी रुपयांचा भरीव असा निधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करून नगरसाठी आणला आहे. त्यातून नगर शहरातील मोठे रस्ते, गटारी, ड्रेनेज लाईन, पथदिवे अशी कामे मार्गी लागणार आहेत. यामुळे येत्या पाच वर्षात नगर शहर हे समस्यामुक्त झालेले आपणास दिसेल. नगर शहरात केडगाव देवी, आचार्य सम्राट आनंदऋषीजी आणि नंतर ग्रामदैवत विशाल गणपती हे तीन रस्ते मोठे आणि सिमेंट काँक्रीटचे करण्यात आले. आणि आता केडगाव इंडस्ट्रियल इस्टेटसाठी मोठी समस्या असलेला मुख्य रस्ता हाती घेण्यात आला आहे. हळूहळू या इंडस्ट्रियल इस्टेटचा अन्य समस्यांमध्ये आपण लक्ष घालून त्या सोडवू असे आश्वासन त्यांनी दिले.

फेज २ अमृत योजना ७० टक्के पूर्ण झाली. मुकुंदनगर, केडगाव, आमरकर मळा, भूषणनगर, सारसनगर, बुरूडगाव रोड येथील नव्याने बांधलेल्या पाण्याच्या टाक्या बांधून कार्यान्वित करण्यात आल्या. ५००० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. वीजबचत करणारे ३२००० एल ई डी पथदिवे बसवून शहर शहर उजळविण्यात आले. नकारात्मक विचारची मंडळी विकास कामात अडथळा आणतात. लवकरच पत्रकार चौक लालटाकी ते तेलीखुंट या रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. दिवाळी नंतर पुढे मिंगारवाला चौकाचे काम सुरु होईल. असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकपर भाषणात बोलताना संतोष बोरा म्हणाले की, आपल्या इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत होते. ही मोठी समस्या होती. आ. संग्राम जगताप यांच्याकडे ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही गेलो त्यावेळी त्यांनी पालिकेची बाट न पाहता खाजगी ठेकेदारांना सांगून स्वखर्चाने हे काम पूर्ण केले. त्याबद्दल इंडस्ट्रियल इस्टेटच्यावतीने आपले आभार मानतो. आणि खड्डयांची समस्या ही काही आजची नाही महाभारतापासूनची आहे. कर्णाचा रथ देखील खड्डयात रुतला होता. आ. संग्राम त्या पद्धतीने नगरचे रस्ते सुधारतील आहेत. त्यामुळे त्यांचा विजय रथ कोणत्याही खड्डयात अडकणार नाही व त्यांच्या विजय रथास कोणीच रोखू शकणार नाही, असे ते म्हणाले.

यावेळी उद्योजक संतोष बोधरा, प्रकल्प समन्वयक मनीषा गिरी यांची भाषणे झाली. नगर शहरात १७ किलोमीटरचे रस्ते नगर शहर उपनगरात या योजने अंतर्गत विकसित होणार आहेत. या रस्त्यांची कामे ४० ते ४५ दिवसात पूर्ण होतील. त्या अगोदर आपण ते पूर्ण करू असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी उपस्थितांचा सत्कार इंडस्ट्रियल इस्टेटच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आला. स्वागत आणि आभार प्रदर्शन संतोष बोरा यांनी केले.

शरद मुथा एज्युकेशन ट्रस्ट संचलित दि आयकॉन पब्लिक स्कूलचे प्रतिरूप संसदेत चमकदार कामगिरी करणारे विद्यार्थी सई जगताप, युक्ती देसरडा, अमरुस राग, रेशनी कलानी यांचे अभिनंदन करण्यात आले.

प्रतिरूप संसदेत आयकॉन स्कूलच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

नगर – शरद मुथा एज्युकेशन ट्रस्ट संचलित दि आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रतिरूप संसदेत मुद्देसूद विचार मांडणी, वादविवाद कौशल्य आणि संसदीय कार्यपध्दतीचा सुंदर आविष्कार सादर केला. द आर्मी पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या प्रतिरूप संसद स्पर्धेत आयकॉनच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून उपस्थितांची मने जिंकली.

सार्वजनिक जीवनात आपले विचार मुद्देसूद मांडताना संबंधित विषयाचा सखोल अभ्यास करावा लागतो. भिन्न विचारांचा विचारांनीच सामना करावा लागतो. देशाच्या संसदेतील अशा चर्चा प्रत्येक जण पाहतो. त्याच धर्तीवर आर्मी पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रतिरूप संसद भरवण्यात आली. आयकॉन पब्लिक स्कूलच्यावतीने सई जगताप, अमरुस राग, युक्ती देसरडा, रोशनी कलानी यांनी अपक्ष संसद सदस्य म्हणून भाग घेतला. सई जगताप आणि अमरुस राग यांनी राज्यसभेत भूमिका पार पाडल्या, तर युक्ती देसरडा आणि रोशनी कलानी यांनी लोकसभेत प्रतिनिधित्व केले.

विद्यार्थ्यांनी उच्च पातळीची वचनबद्धता आणि तयारी दाखवून या स्पर्धेमध्ये जोरदार वादविवाद आणि सखोल चर्चा केल्या. सई जगताप्च्या उत्कृष्ट कामगिरीमुळे तिला राज्यसभेची सर्वोत्कृष्ट खासदार म्हणून प्रथम क्रमांक मिळाला. युक्ती देसरडा हिने देखील उत्कृष्ट कामगिरी करत लोकसभेच्या श्रेणीत द्वितीय क्रमांक मिळवला.

या उल्लेखनीय कामगिरीतून विद्यार्थ्यांनी समर्पण, कठोर परिश्रम आणि स्पर्धात्मक वातावरणात उत्कृष्ट कामगिरी करण्याची त्यांची क्षमता दर्शवली. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे व्यवस्थापन संचालक कर्नल आर.सी.राणा, शैक्षणिक संचालक आराधना राणा, मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी अभिनंदन करून त्यांच्या कामगिरीबद्दल अभिमान व्यक्त केला.

नगरमधील अम्रितसिंग राजपूतची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे करणार प्रतिनिधित्व

नगर – शहरातील जलतरणपटू अम्रितसिंग दीपक राजपूत याची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. नुकतेच डेक्कन जिमखाना पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत जलतरणपटू अम्रितसिंग राजपूत याने ५० मीटर बटरफ्लाय या क्रीडा प्रकारात रौप्य पदक प्राप्त केले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्याची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे.

शहरातील जलतरणपटू अम्रितसिंग राजपूतची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यात आले.

६ ऑगस्ट पासून भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी राजपूत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्याची ही तिसरी राष्ट्रीय स्पर्धा असून, त्याला जिल्हा संघाचे मार्गदर्शक सर्वेश देशमुख, अहमदनगर जिल्हा जलतरण संघटनेचे सचिव रावसाहेब बाबर यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा जलतरण संघटनेचे अध्यक्ष अभिजीत चव्हाण, विक्रजीत चव्हाण, कराळे जलतरण तलावाचे करण कराळे, उदय कराळे, अहमदनगर जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिवे यांनी त्याचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. राजपूत हा सिक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूलचा इयत्ता नऊवीचा विद्यार्थी आहे.

अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती व विजुभाऊ पठारे मित्र मंडळ यांच्या वतीने अण्णाभाऊ साठेच्या जयंतीनिमित्त लालटाकी येथे अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासमोर रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सुमारे ७० युवकांनी रक्तदान केले. यावेळी आ. संग्राम जगताप, उत्सव समितीचे अध्यक्ष विजय पठारे, साहेबराव पाचारणे, अशोक गायकवाड, सुरेश बनसोडे, अविनाश घुले, आकाश आवटी, गणेश पठारे, संदीप ठोकळ, गणेश गायकवाड, रवी उमाप, मयूर चावरे, निलेश पवार, संदीप पठारे आदी

मुंबई येथील सेंट रेजिस हॉटेलमध्ये गालदीवचे पर्यटन मंत्री इब्राहिम फैसल यांना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या द्वारे जगभरात १४० देशात शिकविल्या जाणाऱ्या भारताच्या प्राचीन राजयोगाची पुस्तके ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांनी भेट दिली व संस्थेचे आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबू भेटीचे निमंत्रण दिले.

निरामय

कॅल्शियमचे लाभ मिळवायचे तर...

हाडांसंबंधीच्या दुखण्यामुळे अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं. मुख्य म्हणजे या दुखण्याचा वयाशी कोणताही संबंध नसतो. सदोष जीवनशैली, आहाराकडे होणारं दुर्लक्ष आणि पोषक घटकांच्या कमतरतेमुळे लहान मुलं, किशोर तसंच तरूणांमध्येही पाठदुखी, गुडघेदुखीचं प्रमाण वाढलं आहे. या समस्येला आळा घालण्यासाठी पोषक आहार घ्यायला हवा. * कॅल्शियममुळे हाडं बळकट होत असली तरी हा पोषक घटक कार्यरत राहण्यासाठी सहाय्यक घटकांची गरज असते. त्यापैकी एक म्हणजे झ्ङङ्ग जी-

माहीत असावे

वनसत्त्व. पालेभाज्या, सुका मेवा, दुग्धजन्य पदार्थांमधून कॅल्शियम मिळत असलं तरी सूर्यप्रकाश हा ड जीवनसत्त्वाचा प्रमुख स्रोत आहे. या जीवनसत्त्वाची कमतरता भरून काढण्यासाठी पूरक औषधांची गरज असते. * अतिरिक्त आम्लपित्तामुळे हाडं कमकुवत होतात. या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी लिबूपाणी, कच्च्या बटाट्याचा रस, कोकम सरबत यांचं सेवन करायला हवं. * हाडांमध्ये कॅल्शियम शोषलं जाण्यासाठी के जीवनसत्त्वाची गरज लागते.

धोका ब्रेन ट्युमरचा

बदलती जीवनशैली, कामाचा ताण, जंकफूडचे मोठ्या प्रमाणात सेवन यांसारख्या गोष्टींमुळे अनेकांना विविध आजारांनी ग्रासले आहे. ब्रेन ट्यूमर म्हणजे मेंदूचा कर्करोग हा आजारदेखील त्यापैकीच एक आहे. त्यामुळे निरोगी जीवनशैली ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

ब्रेन ट्यूमर कोणत्याही वयात होऊ शकतो. याचा धोका महिलांपेक्षा पुरुषांना जास्त आहे. जीवनशैलीमध्ये काही महत्त्वाचे बदल करून ब्रेन ट्युमरचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी करता येतो. जगात ब्रेन ट्युमरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. वेळीच लक्षात न आल्यास तो गंभीर स्वरूप धारण करू शकतो. मेंदूतील पेशींच्या अनियंत्रित वाढीमुळे हे घडते. ब्रेन ट्यूमरच्या लक्षणांसह त्याची कारणे जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे, तरच आपण या गंभीर आजारापासून बचाव करू शकतो.

ब्रेन ट्यूमर हा मेंदूच्या पेशींचा एक अनियंत्रित समूह आहे, जो सतत वाढत असतो. हा ट्युमर धोकादायक आणि जीवघेणा आहे. अशक्तपणा, ताणतणाव, समतोल राखण्यात अडचण, लक्ष केंद्रित न करणे, उलट्या, डोकेदुखी, श्रवणशक्ती किंवा दृष्टी कमी होणे, शारीरिक संतुलन बिघडणे ही ब्रेन ट्यूमर रची लक्षणे आहेत. याशिवाय स्मरणशक्ती कमकुवत होणे आणि विचार करण्याच्या क्षमतेवर परिणाम होणे हेदेखील त्याच्या लक्षणांमध्ये समाविष्ट आहे. काही प्रकरणांमध्ये ब्रेन ट्यूमर अनुवांशिक असू शकतात. पालकांना आधीच ब्रेन ट्युमर झाला असेल, तर येणाऱ्या पिढीलाही हा आजार होण्याची शक्यता वाढते. रेडिएशन थेरपी किंवा इतर स्त्रोतांकडून रेडिएशनच्या अधिक संपर्कात आल्याने ब्रेन ट्यूमरचा धोका वाढू शकतो. याव्यतिरिक्त, काही विषारी पदार्थांच्या संपर्कात आल्याने ब्रेन ट्यूमरचा धोका वाढू शकतो. रासायनिक कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये ब्रेन ट्यूमर रचा धोका जास्त असतो.

व्याधी विचार

सामान्यतः लहान मुले आणि वृद्ध लोकांमध्ये हे प्रमाण जास्त दिसून येते. काही प्रकारचे ब्रेन ट्यूमर पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक सामान्य असतात. निरोगी आणि संतुलित आहार घेतल्याने शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत होते. त्यामुळे कर्करोगाचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होतो. ब्रेन ट्युमर टाळण्यासाठी हिरव्या भाज्या, फळे आणि धान्यांचा आहारात समावेश करा. नियमित व्यायाम किंवा योगासने केल्याने शरीर तसेच मन निरोगी राहते. ऊर्जा वाढते, लठ्ठपणा कमी होतो. तसेच अनेक प्रकारच्या कॅन्सरपासून संरक्षण होते. अनावश्यक रेडिएशन थेरपी टाळली पाहिजे. मेंदूचा कर्करोग टाळण्यासाठी, शक्य तितके सेंद्रिय अन्न वापरावे. प्लास्टिकचा कमीत कमी वापर करावा. तसेच रसायनांपासून दूर राहा.



हातापायांना मुंग्या चेतात?

बराच वेळ एकाच स्थितीत आणि एकाच ठिकाणी बसून राहिल्याने हातापायांना मुंग्या येतात. बरेचदा सर्वसामान्य बाब म्हणून आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. पण वारंवार या समस्येकडे केलेलं दुर्लक्ष मात्र महागात पडू शकतं. वैद्यकीय भाषेत या बधीरपणाला पॅरेस्थेशिया म्हणतात. मानवी शरीरात नसा आणि रक्तवाहिन्यांचं जाळं असतं. नसांच्या माध्यमातून संदेशवहन होतं तर रक्तवाहिन्यांमधून वाहणारं रक्त शरीराच्या विविध भागांना ऑक्सिजन आणि पोषक घटकांचा पुरवठा करतं. यापैकी एकावर किंवा दोहोंवर दाब आल्याने त्यांच्या कार्यात अडथळे येतात. या अडथळ्यांमुळे नसांवर भार पडून संवेदना पाठीचा कणा आणि मेंदूकडे परत जातात. यामुळे मेंदू संदेशवहन होत नसल्याचा अर्थ लावतो आणि विशिष्ट अवयवाला मुंग्या येतात. नसांवरचा दाब काढल्यावर आलेल्या मुंग्या निघून जातात.

व्याधी विचार

यालाच तात्पुरत्या स्वरूपाचा पॅरेस्थेशिया असं म्हटलं जातं. पण यानंतरही बधीरपणा दूर झाला नाही तर हा एखाद्या व्याधीचा संकेत असू शकतो. पायांना मुंग्या आल्या तर चालताना अडचणी येतात. नसांवर दाब आल्यानंतर संबंधित अवयव बधीर होतो. अशक्तपणा जाणवतो. अनेकदा घटकांचा पुरवठा करतं. यापैकी एकावर किंवा दोहोंवर दाब आल्याने त्यांच्या कार्यात अडथळे येतात. या अडथळ्यांमुळे नसांवर भार पडून संवेदना पाठीचा कणा आणि मेंदूकडे परत जातात. यामुळे मेंदू संदेशवहन होत नसल्याचा अर्थ लावतो आणि विशिष्ट अवयवाला मुंग्या येतात. नसांवरचा दाब काढल्यावर आलेल्या मुंग्या निघून जातात.

यालाच तात्पुरत्या स्वरूपाचा पॅरेस्थेशिया असं म्हटलं जातं. पण यानंतरही बधीरपणा दूर झाला नाही तर हा एखाद्या व्याधीचा संकेत असू शकतो. पायांना मुंग्या आल्या तर चालताना अडचणी येतात. नसांवर दाब आल्यानंतर संबंधित अवयव बधीर होतो. अशक्तपणा जाणवतो. अनेकदा कोणत्याही कारणशिवायदेखील मुंग्या येतात. अशा परिस्थितीत आपण जागरुक राहायला हवं.

विशिष्ट अवयवावर जास्त काळ दाब राहिला तर नसांचं कायमस्वरूपी नुकसान होऊ शकतं अथवा त्यांच्या कार्यात बिघाड होऊ शकतो. आपल्या चेतासंस्थेवर जीवनशैलीचाही प्रभाव पडत असतो. हात डोक्याखाली ठेऊन न झोपण्याची सवय असणाऱ्यांना सातत्याने या समस्येला सामोरं जावं लागतं. अशा लक्षणांना सॅटर्डे नाईट पाल्सी असं म्हटलं जातं. यामुळे हातांमधून जाणाऱ्या नसांवर प्रभाव पडतो. तंग जीन्स घातल्यावरही पायांना मुंग्या आल्यासारखं वाटतं. याला टिंगलिंग थाय सिंड्रोम असं म्हणतात. तंग जीन्समुळे मांडीतल्या लॅटरल क्युटॅनियस नसीवर दाब आल्याने बाहेरच्या भागाला झिणझिण्या येतात. अशाप्रकारे वारंवार मुंग्या येत असतील किंवा वेदना जाणवत असतील तर तातडीने डॉक्टरांचा किंवा फिजिओथेरपिस्टचा सल्ला घ्यायला हवा. वारंवार मुंग्या येणं हा शरीरयंत्रणेत बाधी तरी बिघाड असल्याचा संकेत असू शकतो. त्यामुळे या तक्रारीकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. शरीराकडून मिळणाऱ्या संकेतांकडे दुर्लक्ष करणं महागात पडू शकतं.

झोप चेत नसेल, तर सावधान!

आजकाल झोप न लागणे ही एक मोठी समस्या बनली आहे. काही लोक निरोगी आरोग्यासाठी डाएट आणि व्यायामही करतात; पण शरीर निरोगी ठेवण्यासाठी सकस आहार आणि व्यायामासोबतच शांत झोपही खूप महत्त्वाची आहे. तज्ज्ञांच्या मते, व्यक्तीला दररोज सात ते आठ तासांची झोप हवी. यामुळे शरीरासोबतच मनही निरोगी राहते; परंतु झोप होत नसेल, तर अनेक विकारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

कार्यालयीन कामकाज, अस्वस्थ आहार आणि जीवनशैली यासोबतच पर्यावरणीय घटकांमुळेही झोप कमी होऊ शकते. याशिवाय काही वेळा काही गंभीर आजारामुळेही झोपेवर परिणाम होऊ शकतो. झोपेच्या कमतरतेमुळे एकाग्रता नसणे, राग येणे, बद्धकोष्ठता यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागतं. सकाळी लवकर उठणे कठीण असू शकते; परंतु झोपेच्या समस्या सोडवण्यासाठी ते खूप प्रभावी असू शकते. सकाळी लवकर उठल्याने रात्री योग्य वेळी झोप येण्यास मदत होते.



आरोग्य चर्चा

व्यायामकेल्यानंतर दुरुस्त राहण्याबरोबरच चांगली झोप येण्यासही मदत होऊ शकते. सकाळची सुरुवात २० ते ३० मिनिटांच्या व्यायामाने करा. तुम्हाला शक्य असतील ते व्यायामप्रकार करा. त्यासाठी वेळ काढा. यामुळे शरीर थकते आणि चांगली झोप लागते. निरोगी आहारामुळे झोपेच्या कमतरतेवरही बऱ्याच अंशी मात करता येते. रात्री तळलेले, मसालेदार, जंक फूड खाणे टाळा. यामुळे गॅस, ॲसिडिटी, ब्लोटिंग सारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे झोपेचा त्रास होतो. रात्रीचे हलके जेवण घ्या. भाज्या आणि कडधान्यांचा समावेश करा. रात्रीचे जेवण झोपण्याच्या किमान दोन तास आधी पूर्ण करा. चांगली झोप हवी असेल तर झोपण्याच्या अर्धा तास आधी फोन, लॅपटॉप, टीव्ही वापरणे बंद करा. त्याऐवजी श्वासोच्छ्वासाचे व्यायाम, हलके स्ट्रेचिंग किंवा पुस्तकांची मदत घेऊ शकता.

अनेकांना असे वाटते की झोपेमुळे येणारा थकवा आणि खराब मूड एक कप कॉफी किंवा चहा पिऊन नियंत्रित केला जाऊ शकतो; परंतु हा उपाय दीर्घकाळ चालणार नाही. झोपेचा अभाव किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अडथळा यामुळे उच्च रक्तदाब, नैराश्य आणि मधुमेह यांसारखे धोके वाढू शकतात. शांत झोपेची इच्छा असेल, तर वर सांगितलेले उपाय करून पाहा आणि तरीही समस्या दूर होत नसल्यास, विलंब न लावता डॉक्टरांचा सल्ला घ्या. ते झोप न येण्याची संभाव्य कारणे शोधून या समस्येचे त्वरीत निराकरण करू शकतील.

केशारोपणामुळे लागू शकते वेड!

आजकाल टक्कल पडण्यापासून सुटका मिळवण्यासाठी हेअर ट्रान्सप्लांट करण्याचा ट्रेंड वाढला आहे. लोक एक-दोन लाख रुपये खर्च करून केस वाढवत आहेत. पूर्वी फक्त सेलिब्रिटीच केस प्रत्यारोपण करायचे; पण आता सामान्य माणूसही त्याची मदत घेत आहे. हेअर ट्रान्सप्लांट माणसाला वेड लावू शकते, असा समज आहे. यात किती तथ्य आहे आणि हेअर ट्रान्सप्लांटशी संबंधित धोके काय आहेत हे समजून घेतले पाहिजे.

आरोग्य वेध

केस प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेमुळे मेंदूचे नुकसान होऊ शकते आणि एखाद्या व्यक्तीला वेड लावू शकते, असे अनेकांचे म्हणणे आहे. मात्र ते योग्य नाही. केस प्रत्यारोपणाचा मेंदूवर कोणताही नकारात्मक परिणाम होत नाही. या प्रक्रियेमध्ये कवटीच्या वरच्या भागावर काम केले जाते. त्यामुळे त्याच्या खालच्या त्वचेवर परिणाम होत नाही. कवटीच्या त्वचेवर आणि मेंदूच्या वरच्या स्नायूंवर केस प्रत्यारोपण केल्यामुळे त्याचा परिणाम मेंदूपर्यंत पोहोचत नाही. परिणामी, केस प्रत्यारोपणामुळे माणसाला वेड लागू शकते, असे म्हणणे चुकीचे ठरेल.

हेअर ट्रान्सप्लांट केल्यानंतर केस लवकर गळू लागतात. परंतु, यामध्ये घाबरून जाण्याचे कारण नाही. कारण हे उपचार काही लोकांसाठी अनुकूल तर काहींसाठी प्रतिकूल ठरू शकतात. काही वेळा त्वचेच्या नुकसानीमुळे प्रत्यारोपण यशस्वी होत नाही. केसांना डाय लावल्यानंतर डोक्याला सूज येऊ शकते. त्याचा परिणाम डोके आणि डोळ्यांवर दिसू शकतो. केस प्रत्यारोपणामुळे खाज येण्याची समस्या उद्भवू शकते. खाज सुटल्यामुळे टाळूमध्ये बदल होऊ शकतात.

केस प्रत्यारोपणामुळे संसर्ग होऊ शकतो. केसांच्या मुळांना इजा होऊ शकते. टाळू आतील बाजूस बुडू शकतो. यामुळे अल्सरचा धोका वाढू शकतो.

चेहऱ्याकडून समजते यकृताचे आरोग्य

आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी राहणे म्हणजे एखाद्या परीक्षेपेक्षा कमी नाही. कारण प्रदुषित हवामान, कामाचा ताण, वेळ मिळत नसल्याने व्यायामाचा अभाव, अशा अनेक गोष्टींमुळे विविध आजारांनी ग्रासले आहे. आपल्या शरीरातील प्रत्येक अवयव आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. यकृत हा आपल्या शरीरातील एक आवश्यक अवयव आहे, जो आपल्याला अनेक प्रकारे निरोगी ठेवण्यास मदत करतो. तो आपल्या रक्तातील विषारी पदार्थ काढणे, तसेच पचनास मदत करणे यासह अनेक महत्त्वपूर्ण कार्ये करतो. काही आजारांमुळे आपल्या यकृतालाही हानी पोहोचू शकते. यकृत खराब झाल्याची काही चिन्हे केवळ शरीरातच नव्हे तर आपल्या चेहऱ्यावरही दिसतात.

यकृताच्या आजाराचे सर्वात स्पष्ट आणि प्रमुख लक्षण म्हणजे कावीळ. त्वचा आणि डोळ्यांचे पांढरे पडदे पिवळे पडणे. हे रक्तामध्ये बिलीरुबिन जमा झाल्यामुळे होते. ते यकृत खराब होण्याचे लक्षण आहे. यकृताच्या आजारामुळे तळहातांमध्ये रक्तप्रवाह वाढल्याने त्वचा लाल होऊ शकते. हे लक्षण हाताच्या तळव्यामध्ये दिसून येते. ॲजिओमामास या लहान रक्तवाहिन्या आहेत. त्या त्वचेच्या पृष्ठभागाजवळ आढळतात.

काळजी घ्या

यकृत खराब असल्यास ॲजिओमासच्या लाल, जांभळ्या रंगाच्या खुणा त्वचेवर दिसतात. यकृताच्या नुकसानीमुळे शरीरात, विशेषतः चेहऱ्यावर द्रव जमा होऊ शकतो. यामुळे विशेषतः डोळ्यांच्या भागात सूज येऊ शकते. यकृताचा आजार शरीरातील हार्मोन्स संतुलन आणि डिटॉक्सिफिकेशन प्रणालीमध्ये व्यत्यय आणू शकतो, परिणामी एक्जिमा किंवा मुरुमांसारख्या त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात. यकृताच्या नुकसानीमुळे त्वचेमध्ये खाज सुटणे, जखम होणे किंवा त्वचेच्या रंगात सामान्य बदल यासह इतर बदल होऊ शकतात.

सवय आहे चुकीची

अनेकांना बोटं मोडण्याची सवय असते. आखडलेली मान आणि पाठही मोडली जाते. यावेळी येणारा आवाज सुखावून जातो. या कृतीमुळे बोटं, पाठ, मान आदी अवयवांना आराम मिळत असल्याचा समज होतो. पण प्रत्यक्षात ही सवय चुकीची आहे. बोटं मोडल्याचे फारसे दुष्परिणाम नसले तरी मान, पाठ मोडणं प्रसंगी त्रासाचं आणि धोकादायक ठरू शकतं. सायनोव्हायल सांध्यावर ताण आल्याने हाडं मोडताना विशिष्ट प्रकारचा आवाज येतो. या सांध्यांमध्ये हवेच्या पोकळ्या असतात. त्या फुटल्याने विशिष्ट आवाज ऐकू येतो. मान, पाठ मोडताना पाठीच्या कण्यालगतच्या स्नायूवर खूप ताण येतो. मान मोडल्याने अस्थिबंध क्षीण होतात शिवाय सांधे एकमेकांवर घासले जातात. हर्निएटेड डिस्कची समस्या असेल तर या सवयीमुळे ती अधिक तीव्र स्वरूप धारण करते.

आपण कुठे चुकतो?



मान आणि पाठ मोडल्याने स्नायू ढिले पडतात. याला हायपरमोबिलिटी म्हटलं जातं. यामुळे सांध्यांना लवकर दुखापत होण्याची शक्यता बळावते. अशी कृती केल्यानंतर एंडॉर्फिन्स स्रवण्याची शक्यता असते. हे एंडॉर्फिन्स म्हणजे नैसर्गिक वेदनाशामकं. पाठ, मान मोडल्यानंतर होणाऱ्या आवाजामुळे मोकळेपणाची जाणीव होत असली तरी प्रत्यक्षात काहीच घडलेलं नसतं.

तज्ज्ञ बोटं, मान, पाठ मोडण्याची सवय चुकीची असल्याचा सल्ला देतात. पण त्याकडे दुर्लक्ष करुन ही कृती केली जाते. पण असं करणं खूप घातक ठरू शकतं, हे वरील विवेचनावरुन वाचकांना समजलं असेल. तुम्ही मोकळ्या वेळेत किंवा तणावाखाली असाल तर अनेकदा बोटे मोडू लागता, त्यामुळे तणावग्रस्त होऊन नका आणि स्वतःला दुसऱ्या कामात व्यस्त ठेवा.

।। नवसंशोधन ।।

बोन मॅरो कॅन्सरवरील प्रभावी औषध

बोन मॅरो कॅन्सरच्या उपचारांच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असा एक शोध लागला. ब्रिटनमधल्या न्यू कॅस्टल विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. लेनालिडोमाईड असं या औषधाचं नाव आहे. निदान झालेल्या मायलोम ग्रस्त रुग्णांवर या औषधाद्वारे उपचार करण्यात आले. त्यांच्यात बरीच सुधारणा झाल्याचं दिसून आलं. हे औषध न दिलेल्या रुग्णांच्या तुलनेत औषध दिलेल्यांच्या तब्येतीत बराच फरक पडल्याचं निरीक्षण शास्त्रज्ञांनी नोंदवलं. मायलोमा हा प्लाझ्मा पेशींचा कॅन्सर असून तो शरीराच्या इतर भागातही पसरू शकतो. म्हणूनच हा शोध महत्त्वाचा आहे.

।। डोळ्यांचं आरोग्य ।।

प्रेसबायोपिया काय आहे?

प्रेसबायोपिया म्हणजे डोळ्यांचं वय वाढणं. शरीरासोबतच डोळ्यांनाही वार्ध्यक्य येतं. साधारणपणे चाळिशीनंतर ही प्रक्रिया सुरू होते. यामुळे जवळचं दिसायला त्रास होतो. जवळप-रास प्रत्येकाला ही समस्या जाणवते. म्हणूनच चाळिशीनंतर जवळपास सर्वांना चष्मा लागतो.

।। दंतकथा ।।

का खराब होतात दात?

दिवसातून दोनदा दात घासणं, दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढून टाकणं अशी सगळी काळजी घेऊनही दातांच्या समस्या निर्माण होतातच. अशा वेळी आपण कुठे चुकतो हेच समजत नाही. तुम्हालाही हा प्रश्न पडला असेल तर काही सवयींमुळे आपले दात खराब होऊ शकतात हे लक्षात घ्या. डेंटिस्टकडे न जाणाऱ्या लोकांच्या दातांमध्ये लवकर खड्डे पडतात तसंच ते कमकुवत होतात. लिंबू चघळणं किंवा आंबट फळं बराच वेळपर्यंत तोंडात धरून ठेवल्याने दात संवेदनशील बनतात. बर्फ चळघणं किंवा चावण्याची सवयही दातांसाठी घातक ठरू शकतं.

।। आजीबाईंचा बटवा ।।

बहुगुणी नारळ

नारळात भरपूर जीवनसत्त्वं असतात. खनिजांनी समृद्ध असं हे फळ आहे. उच्च रक्तदाब असणाऱ्यांसाठी नारळातलं पाणी वरदान ठरू शकतं. यातल्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. ॲसिडिटीचा त्रास असणाऱ्यांनीही नारळपाणी प्यायला हवं. खोबरेल तेलामुळे स्मरणशक्ती वाढत असल्याचं काही अभ्यासांमधून समोर आलं आहे. यातल्या फायबरमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं राहतं. त्यामुळे आपल्या आहारात नारळाचा समावेश करायला विसरु नका.

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

आज आपण ओसवाल समाजाची उत्पत्ती दिन, ह्यावर थोडसं बोलणार आहोत. ओसवाल जातीच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आहे.

भगवान महावीर स्वामींच्या निर्वाणच्या सत्तर वर्षे अर्थात विक्रम संवत ४०० वर्षे पूर्व भीनमाल नगरात भीमसेन नावाचा राजा होता. त्याला दोन पुत्र होते. पुत्राचे नाव होते श्रीपुंज व उपलदेव.

उपलदेवने माण्डोरच्या जवळ उपकेश नगर आज वर्तमानन ध्ये 'उपकेश' नगरला ओसिया या नावाने ओळखतात. भगवान पार्श्वनाथचे सातवे पट्टधन आचार्य रत्नप्रभूसुरिजी आपल्या पाचशे (५००) शिष्यांसमवेत उपकेश नगरात आले. आणि नगरीच्या जवळ लुणादि नावाचे लहान पहाडवर ध्यानस्त होते. राजा उपलदेव आणि प्रजाजन सगळे वाममार्गी लागले होते. 'चामुण्डादेवी'चे ते सर्वजण फार भक्त होते. तेथे रोज बळी देत होते.

जैन बांधवांना शुद्ध शाकाहारी जेवण मिळणे फार अवघड झाले होते. एकदा राजा उपलदेवचे जावई तिलोक सिंहला एका विषारी सापाने दंश मारले, त्याला कोणतेही उपचार लागू पडत नव्हते. शेवटी तो मूर्च्छित होऊन मृतावस्थेत गेला. त्याला स्मशानमध्ये घेऊन निघाले, तेव्हा तेथे जमा झालेल्या प्रजामधून एक व्यक्ति म्हणाला, आपण आचार्यजींकडे घेवून जावूया. तेथे आचार्यश्रीजींचे शिष्य विरधवल याने गुरुंच्या चरणाचे पाणी त्या मृत शरीरावर टाकले, आणि तो व्यक्ति जीवंत झाला. हे पाहू राजा अत्यंत प्रसन्न झाला. त्या आनंदात राजाने गुरुच्या चरणी हिरे, मोती, दागदागिने अर्पण केले. ह्यावर आचार्यश्रीजींनी सांगितले हे वैभव आमच्या काहीच कामाचे नाही, हे काय कामाचे? आचार्यश्रीजी म्हणाले, आमची इच्छा आहे, की आपण अहिंसा धर्म स्विकारावा. आचार्यश्रींचे उपदेश ऐकून राजाचे सर्व मंत्रिमंडळ व प्रजा समवेत अहिंसा धर्म स्विकारला, म्हणजेच जैन धर्म स्विकारला. ह्यावरुन पुढे ओस्वाल म्हणून ओळखले जाऊ लागले. आचार्यश्रीजीने चामुण्डा माता मंदिरात नवरात्रात होणारी पशुहत्या थांबवली. त्यामुळे त्याच्या डोळ्यांना फार वेदना झाल्या, परंतु आचार्यश्रीने आपले 'तपस्त्रेज' तथा समत्व दृष्टीने चामुण्डादेवीला प्रभावित केले. यामुळे देवीने आपले डोळे उघडले. खऱ्या दृष्टीची अनुभूति झाल्याने हीच देवी पुढे ''सच्चियाय माता'' नावाने प्रसिद्ध झाली. एवढेच काय, तर देवीला लाल रंगाचे फुल देखील अर्पण करत नाही, ही ओस्तवाल कुलची माता म्हणून प्रसिद्ध झाली.

– सौ. सविता चोरडिया

नवोदय विद्यालयात ६ वी च्या प्रवेशासाठी १६ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत

नगर – जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे इयत्ता ६ वी मध्ये प्रवेशासाठी प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची तारीख १६ सप्टेंबर अशी आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरुन संधीचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यालयाच्या प्राचार्यांनी केले आहे. जवाहर नवोदय विद्यालयामध्ये ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी https://www.navodaya.gov.in/nvs/nvs- school/Ahmednagar/en/home/ d https://navodaya.gov.in/nvs/en/Admission-JNVST/JNVST-class/ या संकेतस्थळाचा वापर करण्यात यावा. याबाबत १८ जानेवारी २०२५ परीक्षा घेण्यात येणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.

लातूरच्या आश्रम शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हत्येच्या निषेधार्थ नगर शहरातील आंबेडकरी समाजाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश केला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना निवेदन देण्यात आले.

नगर शहरातील आंबेडकरी समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रोश

लातूरच्या आश्रम शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हत्येचा निषेध; आरोपी शिक्षकाला अटक करुन फाशीची शिक्षा देण्याची मागणी

नगर – शहरातील आंबेडकरी समाजाच्या वतीने लातूर जिल्ह्यातील आश्रम शाळेत मागासवर्गीय अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या हत्येच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालया समोर शुक्रवारी (दि.२ ऑगस्ट) आक्रोश व्यक्त करुन या घटनेतील आरोपी असलेल्या शिक्षकाला त्वरीत अटक करुन फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी तीव्र निदर्शने करुन मागासवर्गीय समाजावर होत असलेल्या अन्याय, अत्याचाराचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी आंबेडकरी चळवळीतील विविध राजकीय, सामाजिक व पक्ष संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील स्वामी विवेकानंद आश्रम शाळेत मागासवर्गीय कुटुंबातील अरविंद खोपे हा विद्यार्थी इयत्ता सातवी मध्ये शिक्षण घेत होता. त्याचे आई–वडील यांनी मुलाची परीक्षा असल्यामुळे पांगरी (ता. परळी, जि. बीड) येथून त्याला लातूरच्या सदर आश्रम शाळेत शिक्षण घेण्यासाठी सोडले. २९ जुलै रोजी अरविंदच्या आई–वडिलांना आश्रम शाळेतील शिक्षकांनी फोन करुन त्याच्या पोटाला काहीतरी लागले असल्याचे सांगितले. त्याचे आई–वडील लांब असल्यामुळे त्यांनी त्या भागात जवळ असणाऱ्या नातेवाईकांना फोन करून आश्रम शाळेत पाठविले. नातेवाईक अरविंदला पाहण्यासाठी गेले असता, त्या शिक्षकाने तो आश्रमातून पळून गेलेला असून, त्याचा शोध घेण्याचे सांगितले. त्यानंतर त्याचे आई–वडिल व नातेवाईकांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. परंतु ३० जुलै रोजी पहाटे ३ वाजता आश्रम शाळेचा तोच शिक्षक गुपचूप अरविंदचा मृतदेह जंगलात टाकण्यास निघाला असताना अरविंदच्या नातेवाईकने त्या शिक्षकाला पकडले, त्या शिक्षकाने तेथून पळ काढला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात त्या मागसवर्गीय विद्यार्थ्याचा मारेकरी तो शिक्षकच असून, त्या मुलाची हत्या त्या शिक्षकाने केली असल्याचे निष्पन्न होण्याची शक्यता नाकरता येत नसल्याचे निवेदनात म्हंटले आहे. मागासवर्गीय खोपे कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी या प्रकरणाची चौकशी व्हावी, पसार झालेल्या शिक्षकाला तातडीने अटक व्हावी, शासनाकडून मयत मुलाच्या कुटुंबीयांना २५ लाखाची आर्थिक मदत मिळावी, हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा व आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी शहरातील समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना देण्यात आले.

शहरात पालापाचोळा जाळण्याचे प्रकार सुरुच

हरित लवादच्या निर्णयासह कायद्याची पायमल्ली

नगर – झाडांचा पालापाचोळा जाळण्यास मनाई करण्यात आली असून हा पालापाचोळा खत तयार करण्यासाठी वापरावा, असे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने दिलेले आहे. परंतु शहरात अद्यापही हरित लवादाच्या निर्णयाचे पालन केले जात नसल्याचे वास्तव आहे. छत्रपती संभाजीनगर मार्गावरील जिल्हा पोलिस अधीक्षक निवासस्थानात विविध प्रकारची झाडी असून त्यांचा पालापाचोळा, पाने गळून पडतात परंतु सदर कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया न करता सदर पालापाचोळ्याचा ढिग करुन जाळून त्याची विल्हेवाट लावून हरित लवादाच्या नियमाचा शहरात भंग केला जात आहे.

३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १ च्या दरम्यान सदर प्रकार सुरु होता दरम्यान श्वासासोबत धुरातील ८५ टक्के सूक्ष्मकण फुफ्फुसात खोलवर जमा होतात आणि श्वसन संस्थेवर दबाव निर्माण करतात. ॲलर्जी आणि दमा असणाऱ्यांच्या त्रासात आणखी वाढ होते. धुलीकण विशिष्ट उंचीच्या खालीच तरंगत असल्याने कमी वयोगटातील चिमुकल्यांना त्याचा अधिक धोका आहे.

त्यामुळे हृदयविकार, दमा, ॲनिमिया, फुफ्फुसाचे रोग संभवतो. गर्भवती महिला, नवजात बालके, तसेच ज्येष्ठांना मोठा धोका आहे. झाडांच्या पानांतील बेन्झोपायरीन रसायन शरीरात गेल्यामुळे मनुष्य आणि प्राण्यांमध्ये कर्करोगाचा धोका संभवतो तरी शहरात महापालिका प्रशासनाने ओला कचरा, झाडांचे पाने, पालापाचोळा यांचे खत करण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे मत पर्यावरणवादी नागरिक व्यक्त करत आहेत.

छत्रपती संभाजीनगर मार्गावरील जिल्हा पोलिस अधीक्षक निवासस्थानात विविध प्रकारची झाडी असून त्यांचा पालापाचोळा, पाने गळून पडतात परंतु सदर कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया न करता सदर पालापाचोळ्याचा ढिग करुन जाळून त्याची विल्हेवाट लावून हरित लवादाच्या नियमाचा शहरात भंग केला जात आहे. (छाया – महावीर पोखरणा)

अहमदनगर जिल्हा ॲडव्हर्टायझिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी नितीन देशमुख

उपाध्यक्षपदी गुलशन अरोरा व सचिवपदी प्रसाद मांढरे, सहसचिवपदी जयंत देशपांडे तर खजिनदारपदी किशोर मरकड यांची फेरनिवड

नगर – अहमदनगर जिल्हा ॲडव्हर्टायझिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुदर्शन ॲडव्हर्टायझिंगचे नितीन देशमुख, उपाध्यक्षपदी ॲड मंजिक ॲडव्हर्टायझिंगचे गुलशन अरोरा, सचिवपदी कालिका ॲडव्हर्टायझिंगचे प्रसाद मांढरे, खजिनदारपदी चैतन्य पब्लिसिटीचे किशोर मरकड व सहसचिवपदी क्रिएटिव्ह कम्युनिकेशनचे जयंत देशपांडे यांची फेरनिवड करण्यात आली.

असोसिएशनच्या झालेल्या सभेत अध्यक्ष नितीन देशमुख यांच्या नावाची सूचना फेमचे राज्य उपाध्यक्ष प्रफुल्ल मुथा यांनी मांडली, त्यास राजेंद्र म्यान यांनी अनुमोदन दिले, तर सचिव प्रसाद मांढरे यांच्या नावाची सूचना गुलशन अरोरा यांनी मांडली, त्यास सुरेंद्र मुथा यांनी अनुमोदन दिले.

निवडीनंतर अध्यक्ष नितीन देशमुख यांनी सर्व वृत्तपत्रांचे व्यवस्थापन व जाहिरात एजन्सीमधील सुसंवाद वाढविणे, व्यावसायिक व सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला, तर सचिव प्रसाद मांढरे यांनी संघटनेला बळकटी देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी संघटनेतील सदस्यांनी नूतन कार्यकारिणीचा सत्कार केला.

असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य प्रफुल्ल मुथा (अभी पब्लिसिटी), प्रमोद गांधी (अनामिका पब्लिसिटी), मनोज गुगळे (क्लासिक पब्लिसिटी), राजेंद्र म्यान (गॅलॅक्सी ॲडव्हर्टायझिंग), संतोष बाफना (निर्मल ॲडस्), सुरेंद्र मुथा (आशा पब्लिसिटी), अशोक कानडे (सत्यम ॲडस्), सतीश वैजापूरकर (वैजापूरकर ॲडस्, शिर्डी), ललित कोठारी (कोठारी ॲडस्, श्रीरामपूर), अनिल पांढे (पांढे पब्लिसिटी, श्रीरामपूर).

अहमदनगर शहर सहकारी बँकेतील कर्मचारी राजू डाके यांचा प्रामाणिकपणा

लॉकर धारकाचे विसरलेले दागिने केले सुपूर्त

नगर – अहमदनगर शहर सहकारी बँकेने नेहमीच ग्राहकांना सर्वोत्कृष्ट व प्रामाणिक सेवा दिलेली आहे ही परंपरा बँकेचे कर्मचारी पुढे चालवीत आहे, त्याचा निश्चित अभिमान आपल्या सर्वांना आहे कर्मचारी हा अधिकारी आणि ग्राहक यांच्यातील दुवा असून त्यांच्या माध्यमातून बँकेचा नावलौकिक वाढवला जातो तसेच ग्राहकांचा देखील विश्वास संपादन केला जातो लॉकर धारकाने सोन्याच्या स्वरूपातील आयुष्यभराची कमाई सुरक्षित राहावी म्हणून बँकेच्या लॉकरमध्ये ठेवली जाते या धकाधकीच्या जीवनामध्ये मनुष्याकडून नजरचुकीने आपली मौल्यवान वस्तू विसरून राहत असते अशी घटना अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या सावेडी शाखेमधील लॉकर विभागात घडली. सोन्याचे दागिने लॉकर धारकास कर्मचारी राजू डाके यांनी परत केली. या प्रामाणिकपणाच्या माध्यमातून बँकेच्या नावलौकिकात भर पडेल असे प्रतिपादन चेअरमन सीए गिरीश घैसास यांनी केले

अहमदनगर शहर सहकारी बँक सावेडी शाखेतील कर्मचारी राजू डाके यांनी लॉकरमध्ये खातेदाराचे सापडलेले दागिने परत केल्याचा प्रामाणिकपणा दाखविल्याबद्दल त्यांचा सन्मान करताना चेअरमन सी.ए. गिरिष घैसास. समवेत संचालक मंडळातील सदस्य.

बँक सावेडी शाखेचे कर्मचारी राजू डाके यांनी लॉकर विभागात सापडलेले सोन्याचे दागिने लॉकर धारकास परत केल्याबद्दल बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करताना चेअरमन सीए गिरीश घैसास, व्हाईस चेअरमन डॉ. भूषण अनभुले, संचालक अशोक कानडे, संजय घुले, माणिकराव विधाते, दत्तात्रेय रासकोंडा, निखिल नहार, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन चितळे, वरिष्ठ अधिकारी दिनेश लोखंडे, प्रकाश वैरागर, संजय मुळे, सेवक प्रतिनिधी संतोष मखरे, राजेंद्र गायकवाड आदि उपस्थित होते.

चुकीची दुरुस्ती

दै.नवा मराठाच्या दि.२/८/२०२४ रोजीच्या अंकात पान क्र.५ वर ॲड.नाजिम अहमद इस्माईल शेख, ॲड.कुरेशी फैजान फारुक यांच्या जाहीर नोटीसमध्ये परिशिष्ट : सि.स.नं.१७०१ असे नजरचुकीने छापून आले आहे. त्याऐवजी सि.स.नं.१७०९ असे वाचावे. याची कृपया नोंद घ्यावी.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व विनंतीनुसार या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अमृतलाल मुकुचंद फिरोटिया, रा. लोखंडी पुलाजवळ, स्टेशन रोड, अहमदनगर हे. मु. पुणे यांनी सदरहू मिळकत आमच्या आशिलास कायम खुषखरेदी देण्याचे ठरविले आहे. व त्याप्रमाणे त्यांनी आमचे आशिलास सदरहू मिळकत पूर्णपणे त्यांना विक्रण्याचा अधिकार असून ती पूर्णपणे निर्बंध व निजोखमी असल्याबद्दल आमच्या आशिलास त्याची विश्वास व हमी दिली आहे. या उपरोक्त सदरहु मिळकतीवर कोणाचेही कुठल्याही प्रकारे काही एक साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस जामिन, अभ्रवच्च पोटगी, लिज, अदलाबदल, जनरल मुखत्यार, कौटुंबिक अदलाबदल, वाटप, वाटपाबद्दल वाद वगैरे किंवा कुठल्याही बँक सोसायटी, कोर्ट यांचा दावा अगर बोजा नोटी, क्लेम, मनाई, जप्ती वगैरे, हक्क अधिकार हितसंबंध असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत आम्हाला वरिल पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे, अन्यथा सदर मिळकत पूर्णपणे निर्बंध निजोखमी असल्याचे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचेही कुठल्याही प्रकारे काहीएक तक्रार, हरकत विचारात घेतली जाणार नाही. आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. म्हणून मुदाम ही नोटीस दिली असे.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :–

मौजे नालेगांव, ता. जि.पो. तु. म. ना. पा. अहमदनगर हद्दीतील स.नं. ४६ / १४, प्लॉट नं. ९९ चे क्षेत्र २२५ चौ.मी.

चार्ज चतुःसिमाः–

पूर्वेस – ९ मी. रस्ता दक्षिणेस – ६ मी. रस्ता

पश्चिमेस – प्लॉट नं.२० उत्तरेस – प्लॉट नं. ९८

येथे प्रमाणे चतुःसिमापूर्वक तर्हेगुदत वस्तुसह जाणे येणे हक्क मालकी कब्जा, भागवहिवाटीसह भविष्यातील सर्व लाभ अधिकारासह असलेली मिळकत.

नोटीस दिली असे.

विजय बी. गुगळे
ॲडव्होकेट ॲंड टॅक्स कन्सलटंट
नोटरी पब्लिक (गव्ह. ऑफ इंडिया)
बारातोटी कारंजा, माळीवाडा, अहमदनगर
Ph. (0241) 2346897, Cell 9850873153

दिनांक : ३/८/२०२४
अहमदनगर

श्रावणी सोमवार आणि शिवामूठ (शिवमुष्टीव्रत)

श्रावण मास आणि श्रावणी सोमवार व्रत प्रारंभ

हिंदू धर्म शास्त्रानुसार चातुर्मास प्रारंभ झाल्यावर (म्हणजेच आषाढ शुद्ध एकादशीनंतर) येणारा पहिला मास हा श्रावण मास होय. रूढी परंपरेनुसार या मासापासून व्रत वैकल्ये सुरु होतात. या मासाला पवित्र मास म्हणतात. या मासात श्रावणी सोमवार, नागपंचमी, मंगळागौर पूजन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, शुक्रवारचे व्रत अशी अनेक व्रते केली जातात.





या महिन्यातील प्रत्येक सोमवारी 'श्रावणी सोमवार' हे व्रत केले जाते. या वर्षी हे व्रत ५,१२,१९,२६ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर या दिवशी असणार आहे. श्रावण मासातील सोमवारी शिवाच्या मंदिरात जाऊन शिवपिंडीला अभिषेक घालणे, पूजा करणे, शिवामूठ वाहणे अश्या प्रकारे हे व्रत केले जाते. या लेखातून 'श्रावणी सोमवार' हे व्रत कशाप्रकारे अंगीकारावे, याविषयी विवेचन करण्यात आले आहे.

सोमवार व्यतिरिक्त अन्य व्रते धर्मात संगितल्या प्रमाणे रूढी परंपरेनुसार सुरु असतात. अशा या पवित्र श्रावण महिन्यातील व्रते भक्ती भावाने करून त्या माध्यमातून देवतेचे तत्व ग्रहण करून आनंद घेऊया.

प्रत्येक सोमवारी करावयाचे व्रत म्हणजे श्रावणी सोमवार

श्रावण महिन्यातील दर सोमवारी शंकराच्या देवळात जाऊन त्यांची पूजा करायी आणि शक्य असल्यास निराहार उपवास करावा किंवा नक्त व्रत करावे. यामुळे शंकर प्रसन्न होऊन शिवसायुज्य मुक्ती मिळते.

श्रावण सोमवारी उपवास करून शिवाची विधीवत् पूजा करण्याचे महत्व ग्रंथ व्रत राज यामधील खालील श्लोकातून केले आहे. याचा अर्थही पुढे दिला आहे.

'उपोषितः शुचिर्भूत्वा सोमवारे जितेन्द्रियः। वैदिकैर्लौकिकैर्मन्त्रैर्विधिवत्पूजयेच्छिवम् ।।'

अर्थ : संयम आणि शुचिर्भूतपणा आदी नियमांचे पालन करत सोमवारी उपवास करून वैदिक अथवा लौकिक मंत्राने शिवाची विधीवत् पूजा करावी. शास्त्रकारांनी मनावर संयम ठेवून, शुचिर्भूतपणादी नियम पाळण्यावियिची, तसेच उपवास करण्याविषयी सांगितले आहे. त्याचप्रमाणे आपापल्या ज्ञानाच्या आधारे शक्य असेल, त्या वैदिक अथवा लौकिक मंत्रांद्वारे शिवाची पूजा करायला सांगितली आहे.

शिवाची पूजा कशी करावी हे जाणून घेऊया

१) आपल्या घरातील शिवलिंगाची पूजा करावी. २) शिवलिंग उपलब्ध नसेल, तर शिवांच्या चित्राची पूजा करावी. ३) शिवांचे चित्रसुद्धा उपलब्ध नसेल, तर पाटावर शिवलिंगाचे किंवा शिवांचे चित्र काढून त्यांची पूजा करावी. ४) वरीलपैकी काहीही शक्य नसेल, तर शिवांचा 'ॐ नमः शिवाय ।' हा नाममंत्र लिहूनही त्याची आपण पूजा करू शकतो.'

शिवांची षोडशोपचार पूजा किंवा पंचोपचार पूजा करू शकतो. पूजा करताना शिवांस पांढरे फुल वाहू शकतो. त्रिदल बेल वहावा. शिवांस अर्थ प्रदक्षिणा घालावी. त्या दिवशी शिवाचा 'ॐ नमः शिवाय' असा नामजप अधिकाधिक करावा.

शिवामूठ व्रत करण्याची पद्धत

विवाहानंतर पहिली पाच वर्षे श्रावण सोमवारी शिवामूठ व्रत केले जाते. श्रावण मासात येणाऱ्या चार सोमवारी ४ प्रकारचे धान्य शिवांस अर्पण केले जाते. विवाहानंतरची पहिली पाच वर्षे क्रमवार हे व्रत केले जाते. यात श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी एकमुठ राहून शिवलिंगाची पूजा करावी आणि क्रमाने तांदूळ, तीळ, मूग, जवस आणि सातू (पाचवा सोमवार आल्यास त्या दिवशी) या धान्याच्या पाच मुठी देवावर वाहाव्या.

संदर्भ : **सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**. दत्तात्रेय वाघूळदे

© Sanatan Sanstha

फर्निचर शोरूमसाठी त्वरित पाहिजेत

हुशार, अनुभवी
कामगार पाहिजेत : जागा २
- समक्ष भेटा -
हरिष स्टील फर्नीचर
स्विस अपार्टमेंट, सावेडी रोड, अ.नगर.
9850890005

महिला हेल्पर पाहिजे

वय २० ते ४० वर्ष
संपर्क : दु.३ ते ५
मेघनंद मसाले, दाळमंडई
घ.नं.२४१४
संपर्क : २३४३७५७

Full Time ACCOUNTANT REQUIRED

वाणिज्य विषयातील संबंधित पदवी.
इन्व्हॉइज किंवा फार्मास्युटिकल उद्योगात किमान २ वर्षांचा अनुभव.
टॅलीमध्ये प्रावीण्य आणि TDS, आयकर, वेतन आणि GST अनुपालनाचे ज्ञान
:- Contact :-
+919923077660
+918208733924

- पाहिजेत -

सर्पोट स्टाफ (हेल्पर) - २
१२वी पास/नापास, महिला/पुरुष : वय- १८ ते ३०
- आकर्षक पगार | समक्ष भेटा -
के. प्रकाश इंड्रस्ट्रीज (शांती)
मुंगोरा स्टील्स कंपनी, माळेगाव रोड, अहमदनगर. भो. 966551119

पाहिजेत

RMO	2
O.T. Assistant	2
Accountant	1
ब्रदर	2
सिस्टर	2

- संपर्क -
पंडीत हॉस्पिटल & युनिक ICU
स्टेशन रोड, अहमदनगर.
78753 34430, 94237 93242

रेडिमेड कापड दुकानात पाहिजेत

✻ सेल्समन : ५ जागा
✻ सेल्सबॉईज : ५ जागा
अनुभवीना प्राधान्य
: अर्जासह समक्ष भेटा :
बेस्ट युनिफॉर्मस्
कैलास डेअरीच्या खाली, चर्चरोड, अहमदनगर

पाहिजेत

मार्केटींग एक्झिक्युटिव्ह : २
टीव्ही आणि मोबाईलचा ज्ञान असलेला सेल्समन : २
अकौंटंट : २ (लेडीज)
7972954603
9028832340

पाहिजेत

वॉचमन : १
(बंगल्याकरिता राहणारे कुटूंब)
स्वयंपाकासाठी महिला : १
वेळ : स. ९.०० ते संध्या. ६.०० वाजेपर्यंत
पत्ता : प्रेमदान चौक, सावेडी, अहमदनगर
: समक्ष अर्जासह भेटणे :
9552690662

नावात बदल

माझे आधीचे दहावीपर्यंत नाव घोगरे नाराबीबेती भागवतराव होते. दहावीनंतर माझा सर्व शालेय व शासकीय कागदपत्रांवर घोगरे नारायी भागवतराव असून लग्नानंतर माझे नाव सौ.शिंदे नारायी उमाकांत असे आहे.
आधार कार्ड नं.
640982429897

2 BHK रो-बंगलो विकणे

पोदार शाळेजवळ, केडगाव
हॉल भाड्याने देणे
ऑफिस, अभ्यासिका, क्लासेस, गोडाऊन, योगा, इ.उपयुक्त (बागरोजा हडको जवळ)
7820885758, 9273258896

2 BHK फ्लॅट भाड्याने देणे

मार्केटयार्ड, सारसनगर येथे प्राईम लोकेशनला असलेला सुविधायुक्त 2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
9049582465

बुरुडगाव रोड नक्षत्र लॉन जवळ बंगला विकणे आहे

जागा 950 स्केअर फुट.
बांधकाम 850 स्केअर फुट
संपर्क - 9420263147

१३०० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे

मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतसंस्था, ऑफिसेस, दवाखाना, क्लासेससाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098

दोन रो-हाऊसेस पूर्ण सुविधायुक्त विकणे आहे

भूषणनगर, झेंडा चौक, केडगाव, अ.नगर
9049582465

शॉप भाड्याने देणे आहे

५००० स्क्वेअर फूट
प्लॉट नं.१०, निंबळक-विळद रोड, जामने वसतीजवळ, एमआयडीसी, अ.नगर
98226 55899

1 BHK बंगला छोट्या फॅमिलीसाठी भाड्याने देणे आहे.

डॉक्टर कॉलनी, बुरुडगाव रोड. अ.नगर
9422222238

२०० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे

शनि चौक,
प्रभाकर पुस्तकालयजवळ,
२०० स्क्वे.फूट
फर्निचरसहित
9730707233

बलसागर जीम जीम ट्रेनर कोर्स

Anatomy, Physiology, Kinesiology, Nutrition
मोठी Practical Lab
सरावासाठी फ्रिपूर्ण मशिनरी
9422227711

आखाड स्पे.

येवला, पायखी, शिरूड प्रमाणे आता नगरमध्ये
घरगुती पद्धतीचे मटन
तयार करून मिळेल.
रु. ४००/- प्रति किलो प्रमाणे घेतोच.
ऑर्डर किमान २ तास अगोदर देणे.
मो. **8857912818**

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे

तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा.
वासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

ज्योतिषविषयक

ज्योतिष संबंधी जगातली पहिली वेबसाईट ज्योतिषविषयक सर्व प्रश्नांची उत्तरं
सोप्पे उपाय फक्त २०० रुपयांत
पत्रिकेची गरज नाही, २९ प्रश्नांमधून प्रश्न निवडा सुमारे १५ वर्षांचा अनुभव
वेबसाईट : kakajiastro.com
टेक्निकल प्रॉब्लेम आल्यास संपर्क करा. Mo.9922512206

सुप्रसंवर ... सुप्रसंवर ..... सुप्रसंवर .....
जीवन ज्योत मेडिकल फाउंडेशन
बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
शासकीय नोकरीची पात्रता व हमी असलेले कोर्स
विद्यार्थ्यांनी पॅरामेडिक वैद्य कार्ये करिता पात्रतेच्या उच्च पदांचे
प्रवेश देणे चालू आहे
(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त)
MEDICAL LAB TECHNICIAN (DMLT)
नगर, महानगरपालिका, जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय प्रायमिक / जिल्हा रुग्णालय, मिरवाशीमध्ये, खासगी, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पॅथॉलॉजिकल लॅब, मेडीकल कॉलेजेस व फार्मसी कॉलेजेस मध्ये लॅब टेक्निशियन म्हणून नोकरी मिळवायची सुवर्णसंधी.
वयाची अट नाही ... वय्या करा ... मर्यादित जागा .....
महाराष्ट्रातील अनेक शासकीय व निमशासकीय रुग्णालयामध्ये या अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना लॅब टेक्निशियन पदासाठी (स्कोर. १३००-३५००० वेतन ते ५६००)परती प्रमाणेचा झाली आहे. शासकीय आर्थिकरीतिपणी सुविधा.
महाराष्ट्र शासनाचे Paramedical Council मध्ये रजिस्टेशन करता येते. शासकीय विभ्यवृत्ती व शैक्षणिक कर्जासाठी मार्गदर्शन
पात्रता : १० वी / १२ वी / पदवीधर पास-नापास **कोर्स कालावधी : २ वर्ष**
कॉलेज फी : १०५०० रु प्रती वर्ष
अधिक माहिती व प्रवेशाकरीता आजच संपर्क करा
8830685732, 9373560452
बॉम्बे हॉस्पिटल बिल्डिंग / वेकर्स समोर, बन विभाग कार्यालय मागे, नगर- औरंगाबाद रोड, अहमदनगर - ४१४००१

सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजेत

शहरातील नामांकित सराफी पेढीसाठी
सेल्समन/सेल्सगर्ल पदासाठी भरती करणे आहे.
अनुभवी, सुशिक्षित, उत्कृष्ट संभाषण कौशल्य असणाऱ्यांनाच प्राधान्य.
आकर्षक पगार दिला जाईल. संपूर्ण अर्जासह समक्ष भेटावे.
विजय भागिरथ रायमोकर सराफ
सराफ बाजार, अहिल्यानगर. Mo. 9850199991

होलसेल फ्लेक्स मटेरियल दुकानात अनुभवी मॅनेजर पाहिजेत

सुपरवायझर व मार्केटींग प्रतिनिधी (फूल टाईम) पाहिजेत
पगार १५ ते २० हजार + इन्सेंटीव्ह
भेटा : **प्रितम सेल्स** कॉर्पोरेशन, अ.नगर
9112223001
9112223008

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त
मोफत नेत्ररोग तपासणी शिबीर
+चश्मे वाटप
शाह क्लिनिक ऑप्टीक्स
बाभावाला
हातमपूरा चौक,वरुड संग्रामनगर समोर,अ.नगर
अधिक माहितीसाठी व नोंदणी
9225323853
सकाळी १० ते संध्या ५

अ.नगर कापड बाजार येथे शॉप्स उपलब्ध

ऑफर मर्यादित कालावधीसाठी, सर्व सुविधांयुक्त, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वॉशरुमची सुविधा
अभी नही तो.. कभी नही..
- संपर्क -
9270570699

डॉ. मनिषा शिरसाट
MBBS. DA,
ICU Specialist &
Anaesthesiologists

Lotus Healing
Palliative & Nursing Care

लोटस हीलिंग
पॅलिएटिव्ह आणि नर्सिंग केअर

कॅन्सर, अर्धांगवायू, मेंदूला मार लागल्यामुळे अंथरूणाशी खिळलेले रुग्ण, एकाच जागेवर झोपुन झालेले बेड सोर, इदयाचे आजार, श्वसन आजार, किमोथेरिपी उत्कृष्टपणे असा रुग्णाना होणारा त्रास कमी करण्यासाठी, कुटुंबिय आणि रुग्ण यांचे जीवनमान सुधारणे, रुग्णांची शारीरीक, मानसिक, सामाजिक व अध्यात्मिक गरज पूर्ण करणे, रुग्णाचे आयुष्य आरामाने व आदराने जगण्यासाठी
सर्व प्रकारच्या परावलंबी आणि वयोवृद्ध रुग्णांसाठी हक्काचे घर !!!
२४ तास सेवा | योग्य दरात सेवा | अनुभवी स्टाफ | तज्ञ डॉक्टर | योगा वर्ग | आहार मार्गदर्शन
3D कॉर्नर, शिवाजी नगर, तपोवन मंदिराजवळ, तपोवन रोड, अहमदनगर
Phone - 8983134779

आपण आजारी नसतानाही

हात-पाय गळून जाणे.
अंग दुखणे, पाठ दुखणे.
कंबर दुखणे, थकवा येणे.
कामाचा उत्साह नसणे.
अशक्तपणा वाटणे.

सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

डॉ.सौ. उर्मिला गिते
या सर्व तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, अ.नगर.
मो. **9422740888**

REVOLUTION in animation world

COURSE HIGHLIGHTS
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects

graphic designing
web designing
2d & 3d animation
18 MONTH PROGRAM



CERTIFICATE COURSE IN SOFTWARE PROGRAMMING

C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net

Duration : 6 Months

Delhi Gate Branch	Old ST stand Branch	Pipeline Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001	1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Mailwada Stand, Station Road, A.nagar	Office No. 202, Second Floor, Ruchu Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
9371051769	9371151769	7447761769

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE

दिप : मुकी-गो ध्या वेळा बदलू शकतात

दिनांक : २ ते ९ ऑगस्ट 2024

डेडपूल ॲण्ड वुलवरीन (3D) (इंग्रजी)	8.25 PM
7.30 AM, 10.05 AM, 12.40 PM, 5.50 PM, 11.00 PM	
ओरोमे कहा दम था	8.15 AM, 11.00 AM, 2.00 PM, 7.45 PM, 10.30 PM
बॅड न्युज	11.15 AM
कल्की	07.15 PM
उलझ	8.40 AM, 3.15 PM, 10.40 PM
बाघ - बाबु नाथ, बाबु शेठ (मराठी)	02.00 PM
लाईव्हलांइन (मराठी)	04.45 PM
घरात गणपती (मराठी)	05.00 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher"
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** CINEMA THEATRE AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

घराच्या सुरक्षेची चिंता वाटते ?

फक्त एक कॉल करा
CCTV CAMERA
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

स्वास्थ्य हॉस्पिटल मेडिकल रिसर्च सेंटर

लालटाकी रोड, जहांगदनगर. फोन : (०२५१) २४३०५३०

जाहीर निवेदन

या द्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते आहे की, स्वास्थ्य हॉस्पिटलमध्ये दि. १ ऑगस्ट २०१३ ते ३१ जुलै २०१४ पर्यंतच्या भरती झालेल्या रुग्णांच्या सर्व फाईल (मेडिकोलिगल केसेस सोडून) जाळून नष्ट करण्यात येत आहेत. तेव्हा या काळातील भरती झालेल्या रुग्णांना किंवा नातेवाईकांना काही माहिती आवश्यक असल्यास त्यांनी या दिवसांच्या आत स्वास्थ्य हॉस्पिटलशी संपर्क करावा. सदर निवेदन प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत जरुर कागदपत्रांसहित हॉस्पिटल मेडिकल रेकॉर्ड ऑफिसरशी समक्ष संपर्क करावा. या कालावधीनंतर कोणाचाही कसलीही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. आपणास अधिक माहिती हवी असल्यास हॉस्पिटल सम्न्वयक ऑफिसरशी संपर्क साधावा.
मेडिकल डायरेक्टर
स्वास्थ्य हॉस्पिटल मेडिकल रिसर्च सेंटर, अहमदनगर.

Green Library

EARTH'S Green Library
Greenery for Every Space

Indoor Plants For your Home!
Get a Plant Today!
Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

३९ वे पुण्यस्मरण



आपल्या संस्काररूपी स्मृतींचा.. स्मृतीगंध आजही दरवळत आहे.. प्रत्येक क्षणोक्षणी आपणच आम्हांला प्रेरणा देत आहे..
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली
स्व. सत्यभामाबाई गोविंदराव भुजबळ
स्व. दि. ४/८/१९८५
☆ दुःखावेग ☆
रोहिदास्सरार, अशोकराव, कल्याण, रोहित
समस्त भुजबळ परिवार
हॉटेल जत्रा | रणजित किराणा | हॉटेल रणजित
आलमगीर रोड, निंबार | सुहाना बायपास, निंबार, अ.नगर | सुहाना रोड, अ.नगर
कल्याण प्रोजिजन स्टोअर्स | रणवंती मेडिकल | हॉटेल प्रवास | मुजबळ हेल्थ क्लब
आलमगीर रोड, निंबार. | पाथर्डी रोड, निंबार, अ.नगर. | निंबार, अ.नगर. | निंबार, अ.नगर.
हिना मोती फॉर्मली पाल ब्यूटि | हिना मोती फॉर्मली पाल ब्यूटि
नगर-पाथर्डी रोड, निंबार | हॉटेल मु.रणजित केजरी, नागरदेवळे

।। श्री पुरुषनारायणीची प्रसन्न ।।
गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
श्री तिरुपती बालाजी
दर्शनस्थ श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनस्थ कोल्हापूर महालक्ष्मी

महात्म दि. ३, ४, ५, ६, ८, ९, १० सोमवार ३०२४
कुसिन दि. १२ ऱ्हाणी नगर सुरु (स्थायिक सिंदाना)
☆ दर्शनीय ठ्यवसे ☆
श्री तिरुपती बालाजी व. पद्मावती व. महालक्ष्मी व. महालक्ष्मीचा
व गणेशी पद्मावा दर्शनस्थ व जिन मंदिरमध्ये
व गोविंदराज स्वामी टेम्पल व पद्मावती अम्मा टेम्पल
व श्री कपिलेश्वर स्वामी टेम्पल व कोल्हापूर महालक्ष्मी
☆ प्रतिकृती ☆
₹ 6501/-
☆ समाविष्ट नोंदी ☆
हॉटेल निवास (२, ३, ४ बेडरोम) जनरल, बाथ, जनरल, रोज गरमी वॉटर (१५०० लिटरी) सुपर कलरवाली जेवण सुरुवाने व वाशीने जेवण, विमान प्रवास येथे रिसेप्शन, दर्शन पास
☆ ऑफिस ☆
Amar Prem Maintenance & Multiple services
पत्ता : मो. ९२२३७९९५५ / ९६५७१६५५५
पुणे : मो. ९१७०२५१७१ / ९१७९२७१९१७
जालना : मो. ९७९५१७७९९
नाशिक : मो. ७७०७७४७४१ / ९४२३४१४१३
नांदेड : मो. ९८२२३१२५ / ९१४३२४४३३

VAISHNAVI TILES & TRADING CO.

◆ सर्व प्रकारच्या टाइल्स ◆ ग्रॅनाइट ◆ सॅनिटरी वेअर
◆ पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग ◆ C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.५, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

VARMORA TILES - BATHWARE | KERAKOLL The GreenBuilding Company | GARYSIL German Engineered | colortile | RAK | India's No.1 NIRALI BG | TIMER BOARD | ICON WORLD OF TILE